सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. १५ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ४३ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्रात ५,१२७ कोटींची थेट परकीय गुंतवणूक; २७,५१० रोजगाराच्या संधी

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत ब्लॅकस्टोन समूहासोबत सामंजस्य करार

मुंबई, १४ मे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र शासन तसेच ब्लॅकस्टोन समूहाच्या एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्स आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्स यांच्यात आज महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उद्योग सचिव डॉ. पी.अन्बळगन आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्सचे अध्यक्ष आर.के.नारायणन यांच्यात हा करार स्वाक्षरीत झाला. यावेळी उपमुख्यंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू, उपसचिव लक्ष्मीकांत ढोके, ब्लॅकस्टोन डहायझर्स प्रा. लि.चे वरिष्ठ



व्यवस्थापकीय संचालक तुहिन पारिख, ब्लॅकस्टोन डव्हायझर्स प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक आलोक जैन, एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्सचे व्यवस्थापकीय संचालक आशीष अग्रवाल आदी उपस्थित होते.

हा सामंजस्य करार राज्यातील प्रमुख औद्योगिक आणि मल्टिमोडल लॉजिस्टिक क्षेत्रांमध्ये आधुनिक लॉजिस्टिक्स आणि इंडस्ट्रियल पार्क्सच्या विकासासाठी होणार आहे.

या सामंजस्य करारानुसार महाराष्ट्रात १० हून अधिक आधुनिक औद्योगिक व लॉजिस्टिक्स पार्क्स उभारले जाणार आहेत. यासाठी ७९४.२ एकर जमिनीचे क्षेत्रफळ आहे. यापैकी १.८५ कोटी चौ. फूट जमिनीवर बांधकाम करण्यात येईल. या सर्व प्रकल्पांमध्ये मिळून एकूण थेट परकीय गुंतवणूक ही ५,१२७ कोटी आहे. या करारामुळे थेट व अप्रत्यक्ष अशी एकूण २७,५१० रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे. हे लॉजिस्टिक्स पार्क्स नागपूर, भिवंडी, चाकण, खंडवा, सिन्नर, पनवेल यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी विकसित केले जाणार आहेत. हे प्रकल्प पर्यावरणस्नेही, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरयुक्त व रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देणारे असून, महाराष्ट्र लॉजिस्टिक्स धोरण २०२४ शी सुसंगत असेल.

ही परिवर्तनात्मक भागीदारी नागपूर, मुंबई, पुणे आणि इतर ठिकाणी जागतिक दर्जाचे, पर्यावरण, सामाजिक आणि शासकीय अनुकूल असे औद्योगिक व लॉजिस्टिक्स हब्स तयार करण्याच्या दिशेने पाऊल टाकणारी असून भारतातील उत्पादन, वेअरहाउसिंग व पुरवठा साखळी उत्कृष्टतेसाठी एक सशक्त पायाभूत रचना निर्माण करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

# भार्गवस्त्रची गगनभरारी! भारताचे स्वदेशी ड्रोनकिलर, 'भार्गवस्त्र'ची यशस्वी चाचणी!




गोपाळपूर, ओडिशा : भारताने 'भार्गवस्त्र' या नावाचे स्वदेशी, कमी खर्चिक काउंटर-ड्रोन शस्त्राची चाचणी यशस्वी केली आहे. सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडने हे अत्याधुनिक ड्रोनविरोधी शस्त्र तयार केले असून, ड्रोन हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी ही एक मोठी झेप मानली जात आहे.

गोपाळपूर येथील सीवर्ड फायरिंग रेंजमध्ये घेण्यात आलेल्या चाचणीत, 'भार्गवस्त्र' मधील सूक्ष्म रॉकेट्सनी सर्व लक्ष्य भेदून आपली उद्दिष्टे साधली. भारतीय लष्कराच्या एअर डिफेन्स अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तीन चाचण्या पार पडल्या. दोन वेळा एकेक रॉकेट आणि तिसऱ्या वेळी दोन रॉकेट्स सलग डागण्यात आले.

'भार्गवस्त्र' २.५ किमी अंतरावरून लहान ड्रोन ओळखून नष्ट करू शकते. हार्ड-किल तंत्रज्ञानाने सुसज्ज हे शस्त्र विशेषतः ड्रोनच्या झुंडींचा सामना करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. रशिया-युक्रेन युद्ध आणि अलीकडील ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने वापरलेले 'रिमोट टॉय ड्रोन' याच प्रकारातील होते. भारताने ते सर्व निष्क्रिय करत सामरिक ताकद दाखवून दिली.

भार्गवस्त्रच्या यशस्वी चाचणीनंतर भारताच्या हवाई संरक्षणात आता एक नवा मजबूत घटक सामील झाला आहे. यामुळे भारताची ताकद आणखी वाढली आहे.

# उत्तरप्रदेशात उभारणार देशातील सहावे सेमीकंडक्टर युनिट

### केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला निर्णय

नवी दिल्ली, १४ मे : उत्तरप्रदेशच्या जेवर येथे देशातील सहावे सेमीकंडक्टर युनिट उभारले जाणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आज, बुधवारी झालेल्या बैठकीत याला मंजुरी देण्यात आली. यामुळे सुमारे २ हजार नोकऱ्या निर्माण होतील अशी ग्वाही केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

यासंदर्भात वैष्णव म्हणाले की, इंडिया सेमीकंडक्टर मिशन अंतर्गत आणखी एक सेमीकंडक्टर युनिट उभारले जाईल. पाच सेमीकंडक्टर युनिट्स उभारण्याचे काम प्रगती पथावर आहे. आता सहावे युनिट उभारले जाणार आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी मंजुरी देण्यात आलेले युनिट हे एचसीएल आणि फॉक्सकॉन यांचा संयुक्तरित्या उपक्रम आहे. एचसीएलकडे हार्डवेअर विकसित आणि निर्मिती करण्याचा दीर्घ अनुभव आहे. तर फॉक्सकॉन ही इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रातील जगातील प्रमुख कंपनी आहे. या दोन्ही कंपन्या एकत्रितपणे यमुना एक्सप्रेसवे औद्योगिक विकास प्राधिकरणमध्ये जेवर विमानतळाजवळ एक प्लांट उभारतील. या युनिटचे उत्पादन २०२७ मध्ये सुरू होण्याची शक्यता आहे.

या प्लांटमध्ये मोबाईल फोन, लॅपटॉप, ऑटोमोबाईल्स, पीसी आणि डिस्प्ले असलेल्या इतर डिव्हायसेससाठी डिस्प्ले ड्रायव्हर चिप्स तयार केल्या जाणार आहेत. तर नवीन सेमीकंडक्टर युनिटमध्ये ३७०० कोटी रुपयांची गुंतवणूक होईल. देशातील पहिला सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन प्लांट २०२४ मध्ये अमेरिकेच्या सहकार्याने लाँच करण्यात आला होता. जो मिलिटरी प्लिकेशन्स आणि महत्त्वाच्या टेलिकम्युनिकेशन्सच्या चिप्स तयार करण्यासाठी डिझाइन केलेला होता. या उपक्रमाला इंडिया सेमीकंडक्टर मिशनचे पाठबळ देण्यात आले आहे.

# अमरावतीचे न्यायमूर्ती बी. आर. गवई बनले देशाचे ५२ वे सरन्यायाधीश!

मुंबई: मूळचे महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील न्यायमूर्ती भूषण गवई यांनी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली आहे. संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. ते सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचे उत्तराधिकारी म्हणून सरन्यायाधीश पदावर रुजू होत आहेत.

न्यायमूर्ती भूषण गवई हे अनुसुचित जाती वर्गातील दुसरे सरन्यायाधीश देशाला लाभले आहेत. तसेच ते पहिले बौद्ध सरन्यायाधीश असल्याने भारतीय न्यायव्यवस्थेच्या व्यापक आणि सर्वसमावेशकतेच्या दृष्टीकोनातून त्यांची नियुक्ती महत्वाची मानली जाते.



राष्ट्रपती भवनात बी आर गवईंचा शपथविधी सोहळा पार पडला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी बी आर गवईंना सरन्यायाधीश पदाची शपथ दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या प्रमुख उपस्थितीत हा शपथविधी सोहळा पार पडला. संविधानाच्या कलम १२४(२) अंतर्गत गवईंचे नियुक्तीपत्रक काढण्यात आले, ज्यावर राष्ट्रपतींनी शिक्कामोर्तब करत त्यांच्या नियुक्तीला मान्यता दिली.

न्यायमूर्ती भूषण गवई यांचा कार्यकाळ

न्यायमूर्ती भूषण गवई मे २०१९ पासून सर्वोच्च न्यायालयात रुजू झाल्यापासूनच, देशासाठी प्रमुख निर्णयांत महत्वाची भूमिका बजावत आहेत. गेल्या ६ वर्षांत ते ७०० खंडपीठांत सहभागी होते. ज्यामधून त्यांनी जवळपास ३०० निर्णय घेतले. त्यांनी प्रशासकीय, दिवाणी, फौजदारी, व्यावसायिक आणि पर्यावरणीय कायद्यांसाठी उल्लेखनीय निर्णय घेतले आहेत.

# राज ठाकरे दोन दिवस नाशिक दौऱ्यावर

नाशिक, १४ मे : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे दोन दिवसाच्या नाशिक दौऱ्यासाठी नाशिकमध्ये येणार असून आपल्या पक्षाला मजबूत करण्यासाठी म्हणून त्यांचा हा दौरा असल्याचे पदाधिकारी सांगत आहेत. नाशिक हा कधीकाळी मनसेचा बालेकिल्ला मानला जात. नाशिककरांनी मनसेला तीन आमदार आणि ४० नगरसेवक दिले. नाशिक महापालिकेच्या माध्यमातून मनसेने नाशिकमध्ये सत्ता स्थापन केली. या काळात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या संकल्पनेतून नाशिक शहरात विविध प्रकल्प स्थापन करण्यात आले. टाटा, अंबानी यांच्या सीएसआर निधीतूनही काही प्रकल्प साकारण्यात आले. मात्र नंतरच्या काळात मनसेला ओहोटी लागली. पक्ष स्थापनेपासून सोबत असलेले राज यांचे शिलेदार त्यांना सोडून गेले. विधानसभा, लोकसभा निवडणूकांमध्ये पक्षाच्या भूमिकेमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम दिसून आला होता. आता सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर नाशिकच्या दौऱ्यावरती राज ठाकरे हे दिनांक १५ पासून येणार आहेत.

# विदेश मंत्री एस जयशंकर यांची सुरक्षा वाढवली, ताफ्यात बुलेटप्रूफ वाहन

मुंबई: ऑपरेशन सिंदूरनंतर विदेश मंत्री एस जयशंकर यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. त्यांना झेड श्रेणीची सुरक्षा प्रदान करण्यात आली असून, त्यांच्या ताफ्यात बुलेटप्रूफ वाहन जोडण्यात आले आहे.

ऑपरेशन सिंदूरमध्ये विदेश मंत्री जयशंकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. याआधी आणि नंतरही ते पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत सतत बैठका घेत होते. अनेक महत्वाच्या आणि पडद्यामागील गोष्टींमुळे, सध्याची परिस्थिती पाहता एस जयशंकर यांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. ऑपरेशन सिंदूर नंतर पाकिस्तानने भारतातील अनेक ठिकाणी हल्ले करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काही प्रतिष्ठित व्यक्तींच्या जीवाला देखील त्याचा धोका असण्याची शक्यता लक्षात घेता, हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी आणि पाकिस्तानी दहशतवाद्यांना ठार करण्यासाठी भारताने ऑपरेशन सिंदूरची धडक करावी केली. त्यांनंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला, लष्करी कारवायापर्यंत हा तणाव वाढला. मात्र, सध्या भारत पाकदरम्यानच्या अघोषित युद्धाला आता विराम मिळाला आहे. असे असले तरी, पाकड्या आपल्या कुरापती करणं सोडत नाहीय. त्यामुळे सध्याची परिस्थिती पाहता विदेश मंत्री एस जयशंकर यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली असून. त्याच्या घराबाहेरही सुरक्षा वाढवण्यात आली आहे. तसेच त्यांना बुलेटप्रूफ कार देण्यात आली आहे.

विदेश मंत्री जयशंकर यांच्या ताफ्यात समाविष्ट करण्यात आलेली बुलेटप्रूफ कार सुरक्षेच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्वाची आहे. या कारच्या काचा खूप जाड असतात आणि त्या लॅमिनेटेड केलेल्या असतात. ज्यामुळे कोणत्याही बंदुकीची गोळी त्याला भेदून आत जाऊ शकत नाही. तसेच या कारचा टायर पंक्चर जरी झाला तरी ते ५० किलोमीटरपेक्षा जास्त धावू शकते. प्रत्येक प्रकारचे हल्ले लक्षात घेऊन या कारची डिझाइन केली गेली आहे.

# कॅनडाच्या परराष्ट्रमंत्रीपदी भारतीय वंशाच्या अनिता आनंद

ओटावा , १४ मे : कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी सत्ता स्थापन करून मंत्रिमंडळाचा विस्तार केला आहे. यामध्ये भारतीय वंशाच्या अनिता आनंद यांची परराष्ट्र मंत्री पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.कार्नी हे अल्पकाळात पुन्हा सत्तेवर आले आहेत. परंतू, त्यांच्या लिबरल पक्षाला कमी बहुमत मिळाले आहे.

अनिता आनंद यांनी मंगळवारी(दि.१३) गीतेवर हात ठेवून मंत्रिपदाची शपथ घेतली. या मंत्रिपदी त्या कॅनडाच्या पहिल्या




हिंदू महिला आहेत. आनंद यांच्यामुळे कॅनडासोबत भारताचे बिघडलेले संबंध सुधरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कॅनडाचे अमेरिकेसोबतही संबंध बिघडलेले आहेत. यामुळे अनिता आनंद यांना मोठी आव्हाने पेलावी लागणार आहेत.

जस्टिन ट्रूडो यांनी खलिस्तानीवादींच्या प्रेमामुळे भारताशी वाकडे घेतले होते. कॅनडामध्ये जून, जुलैमध्ये निवडणूक होणार होती. परंतू त्यापूर्वीच ट्रुडो यांची लोकप्रियता घसरू लागली होती. याचा फटका बसू नये म्हणून त्यांच्या पक्षाने ट्रुडो यांना पायउतार होण्यासाठी दबाव आणला होता. ट्रुडो जानेवारीदरम्यान पायउतार झाल्यानंतर त्यांच्या जागी कार्नी यांच्याबरोबरच अनिता आनंद यांचेही नाव चर्चेत होते. परंतू, पक्षाने कार्नी यांना संधी दिली होती.

मेलानी जोली यांना उद्योग मंत्री करण्यात आले आहे. तर फ्रँकोइस-फिलिप शॅम्पेन या अर्थमंत्रीच राहणार आहेत. डोमिनिक लेब्लँक यांना व्यापार मंत्री करण्यात आले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडाविरुद्ध दाखवलेल्या आक्रमकतेचा प्रतिकार करण्याचे आश्वासन देऊन कार्नी यांनी ही निवडणूक जिंकली आहे. यामुळे आता कार्नी सरकारला भारताशी संबंध सुधारताना अमेरिकेशी दोन हात करावे लागणार आहेत. महत्वाचे म्हणजे कॅनडा आर्थिक संकटाशीही झुंज देत आहे.

# बांगलादेशमध्ये शेख हसीना यांच्या पक्षावरील बंदीच्या निर्णयावर भारताची नाराजी

नवी दिल्ली, १४ मे - बांगलादेशमधील मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकारने गेल्या काही दिवसापूर्वी शेख हसीना यांचा पक्ष अवामी लीगवर देशाच्या दहशतवादविरोधी कायद्याअंतर्गत बंदी घालण्यात आली.बांगलादेशच्या अंतरिम सरकारने घेतलेल्या या निर्णयावर आता भारताने नाराजी व्यक्त करत भूमिका स्पष्ट केली.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी रणधीर जयस्वाल यांनी बांगलादेशमधील अंतरिम सरकारने अवामी लीग पक्षावर घातलेल्या बंदीबाबत बोलताना म्हणाले की, योग्य प्रक्रिया राबल्याशिवाय अवामी लीग पक्षावर घालण्यात आलेली बंदी आणि यासंदर्भातील घटनाक्रम चिंताजनक आहे. लोकशाही देश म्हणून भारताला लोकशाहीचे स्वातंत्र्य आणि राजकीय परीघावरील येत असलेली गदा याबद्दल स्वाभाविकपणे चिंता आहे. बांगलादेशात मुक्त, निष्पक्ष आणि सर्वसमावेशक निवडणुका लवकर घेण्यास आम्ही पाठिंबा देतो, असेही रणधीर जयस्वाल यांनी म्हटले आहे.

तत्पूर्वी, मोहम्मद युनूस यांच्या अंतरिम सरकारने दहशतवादविरोधी कायद्याअंतर्गत 'अवामी लीग'वर बंदी घालण्यात येत असल्याची घोषणा केली. एका निवेदनात असे म्हटले आहे की, देशाची सुरक्षितता आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करण्याच्या हितासाठी बांगलादेश आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणात अवामी लीग आणि त्यांच्या नेत्यांविरुद्ध खटला पूर्ण होईपर्यंत ही बंदी लागू राहील. दरम्यान, गेल्या वर्षी ५ ऑगस्ट रोजी शेख हसीना यांना बांगलादेश सोडून दुसऱ्या देशात पलायन करावे लागले होते. त्यानंतर पुढच्या काही दिवसांतच बांगलादेशात नोबेल पारितोषिक विजेते युनूस यांच्या नेतृत्वात अंतरिम सरकार स्थापन झाले. तेव्हापासून शेख हसीना आणि अवामी लीगच्या नेत्यांवर अनेक गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

# पाकिस्तान पाठोपाठ भारताचा तुर्की आणि चीनला दणका!

## भारताने बंद केले तुर्की आणि चीनचे एक्स-अकाऊंट

नवी दिल्ली : भारत सरकारने आज, बुधवारी तुर्की सरकारी वाहिनी टीआरटी वर्ल्ड आणि चीनच्या सरकारी माध्यम 'ग्लोबल टाईम्स' आणि शिन्हुआचे 'एक्स' अकाउंट ब्लॉक केले. या खात्यांवरून भारतीय सैन्याबद्दल निराधार बातम्या पसरवल्या जात होत्या. ही माध्यमे पाकिस्तानकडून ड्रोन हल्ले आणि भारतीय हद्दीत घुसखोरीचा प्रयत्न अशा खोट्या बातम्या देखील पसरवतात.

'ग्लोबल टाईम्स' हे चीनच्या सरकारचे मुखपत्र आहे. अत्यंत आक्रमकपणे चीनच्या सरकारची बाजू मांडण्यासाठी ते जगभरात कुख्यात आहेच. आता या मुखपत्राने आपल्या एक्स अकाउंटवरुन ब्लॉक करण्यामागे विशिष्ट कारण अधिकृतपणे पुष्टी केलेले नसले तरी ही कारवाई भारताने शत्रु राष्ट्रांकडून भारताच्या अपप्राचाराला अंकुश लावण्याच प्रकार आहे. चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या आश्रयाखाली काम करणारे ग्लोबल टाईम्स अनेकदा भारतावर टीका करणारे आणि बीजिंगच्या भू-राजकीय भूमिकेशी जुळणारे कथा प्रकाशित करते. त्याच्या सामग्रीवर चुकीची माहिती पसरवल्याबद्दल वारंवार टीका झाली आहे, विशेषतः २०२० च्या गलवान संघर्षासारख्या वाढत्या भारत-चीन तणाव निर्माण झाला असताना ग्लोबल टाईम्सने अत्यंत निराधार माहिती देत भारताची बदनामी करण्याचा प्रयत्न केला होता.

# दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात एर्टिगा कार पलटी; दोन ठार, चार गंभीर जखमी

तभा वृत्तसेवा

अंबाजोगाई : अंबाजोगाई-आडस रस्त्यावरील उमराई पाटीजवळ आज दुपारी एक भीषण अपघात घडला. दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात एर्टिगा कार उलटून झालेल्या या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील एक कुटुंब विवाह समारंभासाठी एर्टिगा कारमधून (एमएच ०५ सीव्ही ९१८६) अंबाजोगाई येथे येत होते. यावेळी उमराई पाटी परिसरातील दत्त मंदिरासमोर एक दुचाकीस्वार अचानक कारसमोर आला. दुचाकीस्वाराला धडक टाळण्याच्या प्रयत्नात चालकाचा कारवरील ताबा सुटला आणि कार रस्त्याच्या कडेला जाऊन उलटली. या भीषण अपघातात शौकत अहमद शेख (वय ४६) आणि खय्युम अब्बास अत्तर (वय ४५) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. इतर चार जण गंभीर जखमी असून त्यांना उपचारासाठी तातडीने स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपचा झेंडा फडकविणार : गजाननराव घुगे

तभा वृत्तसेवा

हिंगोली, १४ मे : आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका तसेच नगर पंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये भाजपचा झेंडा फडकविणार असल्याची माहीती नवनिर्वाचित भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



हिंगोली भारतीय जनता पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी माजी आ. गजाननराव घुगे यांची निवड झाली असून या निवडीनंतर त्यांनी दि १४ मे रोजी त्यांच्या ज्ञानेश्वरी निवासस्थानी पत्रकार परिषद घेतली. यावेळी जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांनी भाजपच्या पक्षश्रेष्ठींचे आभार मानले तसेच भारतीय जनता पक्षाचे संघटन जिल्ह्यात अधिक बळकट करीत तळागाळातील प्रत्येक कार्यकर्त्याला न्याय देणार असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपला जिल्ह्यात यश संपादन करण्यासाठी तसेच प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेवर भाजपचा झेंडा फडविण्यासाठी काम करणार आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्ष स्तरावर युती करण्यासंदर्भात जो निर्णय वरिष्ठ स्तरावर होईल त्या अनुषंगाने काम करणार असल्याचे यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी सांगितले. या निवडणुकांमध्ये आमच्या पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडुन आणून सत्ता स्थापनेसाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या दरम्यान जर कोणी अंगावर येत असेल तर त्याला शिंगावर घेण्याची देखील आपली तयारी असल्याचा इशारा जिल्हाध्यक्ष घुगे यांनी दिला आहे. यावेळी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### मांडाखळीत ५० फूट उंच धम्म ध्वजाचे ध्वजारोहण

बौध्द उपासक-उपासिकांची उपस्थिती

**परभणी,/प्रतिनिधी :** संपूर्ण विश्वाला प्रज्ञा, मैत्री, करूणा व शांततेचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुध्द यांच्या २५८७ व्या जयंती निमित्त तालुक्यातील मांडाखळी परिसरात नियोजित बुध्द विहाराच्या जागेवर आज सोमवारी (दि. १२) सकाळी १० वाजता ५० फूट उंच धम्म ध्वजाचे ध्वजारोहण पूज्य भंते मोगलायन यांच्याहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसच्या अनु.जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांची उपस्थिती होती. प्रारंभी तथागत भगवान बुध्द, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भंते मोगलायन यांनी उपस्थित सर्वांनाच त्रिशरण पंचशील दिले. यावेळी हत्तीअंबीरे यांनी जागतिक दर्जाच्या लवकरच साकार होणाऱ्या गोल्डन बुध्द विहाराच्या या जागेवर भव्य बुध्द मूर्ती लवकरच बसवण्यात येणार आहे, अशी माहिती दिली.
यावेळी मांडाखळी, उमरी तसेच आजूबाजूच्या गावातील बौध्द उपासक व उपासिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान, व्हीएतनाम या देशात आयोजित वैशाख पौर्णिमेच्या उत्सवाला डॉ. हत्तीअंबीरे यांना आमंत्रित करण्यात आले होते, त्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

### रायरेश्वर माध्यमिक विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**परभणी,/प्रतिनिधी :** ज्ञानसाधना प्रतिष्ठान संचलित रायरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला आहे.

या विद्यालयाची श्वेता प्रदीप खवले हीने ९९ टक्के गुण घेवून प्रथम, शितल भारत गायकवाड व चैतन्य उमाकांत जोशी या दोघांनी ९८ टक्के गुण घेवून द्वितीय तर श्रुती अच्युतराव गरुड हिने ९७.२० टक्के गुण घेवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. या परिक्षेत रायरेश्वर विद्यालयाचे एकूण २३० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यामध्ये ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेणारे ५४ विद्यार्थी, ७५ टक्के पेक्षा जास्त गुण घेणारे १७७ विद्यार्थी आहेत. विषयनिहाय निकालामध्ये मराठी ९८, हिंदी ९७, संस्कृत १००, इंग्रजी ९९, गणित ९९, विज्ञान ९७ सामाजिक शास्त्र ९७ गुण विद्यार्थ्यांनी संपादन केले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष प्राध्यापक किरण सोनटक्के, संस्था सचिव प्राचार्या सौ. शितल सोनटक्के, समन्वयक आर. जी. पोले, विभाग प्रमुख चिंचाने, कुलकर्णी, परीक्षा प्रमुख परडे, सौ. लोहट, निवासी प्रमुख श्री. चव्हाण, श्री. शेख सलीम तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### पारवा गुन्ह्यातील आरोपीस लावला मोक्का जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयाद्वारे कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी ग्रामीण पोलिस ठाणे हद्दीतील पारवा शिवारातील एका आखाड्यावरील महिलेवर अमानूष अत्याचार करुन तीचे दागिणे लूटणाऱ्या टोळीवर जिल्हा पोलिस अधिक्षकांनी मोक्का कायद्यांतर्गत कठोर स्वरुपाची कारवाई केली आहे.

२ फेब्रुवारी रोजी पारवा शिवारातील शेत आखाड्यावर राहणाऱ्या कुटूंबियांवर दरोडा टाकून एका टोळीने तेथील महिलेवर अत्याचार केला. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाने या प्रकरणातील आरोपीस शोधून काढले. सदर आरोपीकडे तपास करीत असतांना चौकशी केली तेव्हा या आरोपींवर यापूर्वी देखील गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल झाले आहेत. त्यांच्या या कृत्याला पायबंद घालण्यासाठी कठोर कारवाईची गरज होती. त्याकरीता मकोका संघटीक गुन्हेगारी प्रतिबंध कायदा अन्वये त्यांच्या विरुध्दचा प्रस्ताव नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्याकडे पाठविण्यात आला होता. तो त्यांनी मंजूर केला. त्यामुळे आता या आरोपींविरोधात मोक्का कायदा लावण्यात आला आहे.

पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस निरीक्षक विवेक पाटील, ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्रीकांत डोंगरे यांच्या नेतृत्वाव सहाय्यक पोलिस निरीक्षक विक्रम हराळे, साईप्रकाश चन्ना, केंद्रे, चट्टे, भूजबळ, गणेश कौटकर, आगळे यांचा सहभाग असून संघटीत गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रसेन देशमुख यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला आहे.

### सामाजिक न्याय विभागाचा निधी वळविणाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करा- परभणी जिल्हा काँग्रेस कमिटीची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय विभागाचा लाडकी बहिण योजनेत गैरवापर करणाऱ्या व एससी,एसटी ॲट्रोसिटी कायद्याखाली निधी वळविणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांविरोधात राज्यपालांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी परभणी जिल्हा काँग्रेस कमिटीने केली आहे.

राज्याचे समाजकल्याण मंत्री संजय सिरसाट यांनी माध्यमांशी बोलतांना सामाजिक न्याय विभागाचा निधी इतरत्र वळविण्यात आल्याबद्दल विधान केले. वास्तविकतः सामाजिक न्याय विभागाचा निधी वळविणे हे आर्थिक संकट आणि अनुसूचित जाती जमातीवर अन्यायकारक आहे. कारण हे पैसे संविधानाच्या नियमातून आलेले आहेत. त्यामुळे एससी, एसटी कायदा १९८९ चे कलम ३ (१) (एक्स) नुसार एससी, एसटी समूदायाच्या हक्कांना धक्का देणारे आहे. त्यामुळेच या प्रकरणात जो कोणी असेल त्या विरोधात कठोर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते तथा मिडीया विभागाचे उपाध्यक्ष सुहास पंडीत, जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष अमोल जाधव, वैजनाथ देवकते, अनिल सुर्यवंशी, सिध्दार्थ उघाडे, दिगंबर खरवडे आदींनी केली.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# ग्राम महसुल अधिकारी यांचा तलाठी सज्जा चालतो शहरातूनच

## जिल्हाधिकारी यांचे दुर्लक्ष, जिल्हाभर महसुल प्रशासन मस्त, जनता त्रस्त

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जल्हाधिकारी परभणी यांच्याकडे संजय रामराव आडे सामाजिक कार्यकर्ते जिंतूर यांनी दिनांक ८ मे २०२५ रोजी निवेदन केले आहे.
जिंतूर तालुक्यातील महसूल कार्यक्षेत्रातील सर्वच तलाठी सज्जा हे जिंतूर शहरात खाजगी कार्यालय थाटून खाजगी मदतनीस नेमत त्यांच्याकडे अति महत्त्वाचे शासकीय दस्तऐवज ठेवत असल्याचे निदर्शनास आले असून सदरचे तलाठी सज्जे हे जिंतूर शहरात टेलिफोन ऑफिस रोड ते शिवाजीनगर, तहसील कार्यालयाच्या पाठीमागे, आमदार कॉलनी आदी भागात सद्यस्थितीला चालू आहे ते आपल्या महसूल कार्यक्षेत्रात येत असल्याने तलाठी सज्जे हे तलाठ्यांच्या त्यांच्या नेमणूक आदेशानुसार त्यांच्या नेमणूक केलेल्या ठिकाणी सुरू करणे व शासन आदेशानुसार खाजगी मदतनीस नेमणूक केलेले खाजगी व्यक्ती काढून टाकण्यासंबंधी आपल्या स्तरावरून आदेशित करणे संबधीचे निवेदन दिले असुन त्यामध्ये कार्यासन अधिकारी महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक संकीर्ण २०२४/ प्र.क्र.३६३/ई-१० दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांना दिलेल्या आदेशात स्पष्ट नमूद केले आहे की,अप्पर महासंचालक लाच लुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई यांनी सापळा पडताळणी कारवाईदरम्यान तलाठी हे शासकीय कामकाज एखाद्या खाजगी जागेतून खाजगी कार्यालयात करतात तसेच त्यांचे शासकीय कामे करण्यासाठी अनाधिकृत पणे खाजगी इसम नेमतात व त्यांच्याकडून खाजगी कामे करून घेतात तसेच खाजगी कार्यालयात शासकीय दस्तऐवज ठेवतात ही बाब उचित कारवाई करण्यासाठी शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे त्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार ग्राममहसूल अधिकारी पूर्वीचे पदनाम तलाठी यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या नमूद केलेले आहेत सदर कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडताना ग्राममहसूल अधिकारी यांनी शासनाच्या नियमाचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे तसेच म.ना.से वर्तणूक नियम १९७९ अन्वये प्रत्येक शासकीय कर्मचारी अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पालन करताना वर्तणूक विषयक नियम विहित करण्यात आलेले आहेत सदर नियमाचे पालन प्रत्येक शासकीय कर्मचारी अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे, ग्राममहसूल अधिकारी हे नेमून दिलेल्या सध्याच्या ठिकाणी काम करतात सदर सज्जा कार्यालय शासकीय जागेमध्ये अथवा शासन मान्यता प्राप्त भाड्याच्या जागेमध्ये आहेत त्यामुळे ग्राम महसूल अधिकारी यांनी शासकीय कामकाज खाजगी कार्यालयातून करण्याचा प्रश्न उद्भवत नाही तसेच ग्राममहसूल अधिकारी यांनी शासकीय कामकाज करण्यासाठी खाजगी व्यक्ती मदतनीस नेमण्याबाबत शासन स्तरावरून कोणत्याही सूचना देण्यात आलेल्या नाहीत तलाठी सज्जा हे कामकाज खाजगी कार्यालयातून करत असल्याचे खाजगी जागेमध्ये शासकीय दस्तऐवज ठेवत असल्याचे निदर्शनास आल्यास तसे शासकीय कामकाज करण्यासाठी खाजगी व्यक्तीना नेमत असतील तर संबंधित तलाठी त्यांच्याविरुद्ध मनाचे शिस्त व अपील नियम १९७९ नुसार तात्काळ कारवाई करण्यात यावी तसेच या सूचना सर्व तलाठ्यांना निदर्शनास आणून द्याव्यात असे स्पष्ट आदेश महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई महाराष्ट्र राज्य यांनी सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे त्यानुसार आपल्या जिंतूर महसूल कार्यक्षेत्रात दिसून येत नाही. त्यामुळे आपल्या महसूल विभाग कार्यक्षेत्रा मध्ये माझ्या अशे निदर्शनास आले आहे की, महसूल कार्यक्षेत्रात शासन स्तरावरून आपण नेमणूक केलेले ग्राम महसूल अधिकारी तलाठी यांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी तलाठी सज्जे सुरू केलेले नसून त्यांनी खाजगी मदतनीस नेमून त्यांचे मार्फत आपल्या सोयीनुसार कामकाज करत असून शासकीय दस्तऐवज त्यांच्याकडे ठेवत असून सर्वच सज्जे हे जिंतूर शहरातील टेलिफोन ऑफिस रोड शिवाजीनगर तहसील कार्यालयाच्या पाठीमागे आमदार कॉलनी आदी भागात सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना नाहक जिंतूर शहरात चकरा मारावी लागत आहे त्यामुळे शेतकऱ्यांना नाहक आर्थिक खर्च व विनाकारण वेळ घालवावा लागत आहे. तरी आपल्या महसूल कार्यक्षेत्रात येत असलेल्या तलाठी सज्जे ग्राम महसूल अधिकारी (तलाठी/ मंडळ अधिकारी) यांना नेमणूक केलेनुसार त्यांना नेमणूक आदेश दिलेनुसार त्यांच्या नेमणूक केलेल्या ठिकाणी तलाठी सज्जे स्थलांतरित करून तलाठी सज्जा दिलेल्या ठिकाणी सुरू करणे तसेच खाजगी व्यक्ती मदतनीस न ठेवणे संबंधी आपल्या स्तरावरून तातडीने दखल घेऊन त्यांना दिलेल्या ठिकाणी सज्जे सुरू करण्यास आदेशित करण्यात यावेत अन्यथा या सर्व बाबी वरिष्ठ कार्यालयाच्या निदर्शनास आणून देऊन पुढील होणाऱ्या कार्यवाहीस आपण जबाबदार राहाल असे निवेदन दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी तहसीलदार महसूल विभाग जिंतूर यांच्याकेडे केली होती त्याअनुषंगाने तहसीलदार जिंतूर यांनी दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी जिंतूर महसूल कार्यक्षेत्रातील सर्वच तलाठी सज्जा यांना पत्राद्वारे कळविले आहे की, आपली कार्यालय हे शासकीय व शासनमान्य प्राप्त भाड्याचे जागेत आहे व न्यू दिलेल्या सज्जावर आहे तसेच आपले सज्जेवर खाजगी व्यक्ती कामासाठी नेमण्यात आले नसले बाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास तात्काळ सादर करावे विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी असे कळविले होते परंतु तहसीलदार जिंतूर यांच्या पत्राला केराची टोपली दर्शवून सदरील सर्वच तलाठी सज्जा हे तक्रार अर्जात नमूद केले प्रमाणे जिंतूर शहरात ठाण मांडून बसलले असल्याने जिल्हाधिकारी परभणी यांनी याकडे विशेष लक्ष देण्याची अत्यंत आवश्यक आहे त्यामुळे शेतकऱ्याना शेती विषयक व विद्यार्थी यांना शैक्षणिक कामासाठी ३ वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र काढण्यासाठी तलाठी अहवाल घेण्यासाठी शहरात चकरा माराव्या लागत आहे एवढेच नव्हे तर चोरट्या मार्गाने गौण खनिज वाहतूक करणारे यांच्यावर कोणत्याही प्रकारची अंकुश राहिले नाही त्यामुळे शासनाचा महसूल बुडत आहे त्यामुळे जिल्ह्यातील सर्व तलाठी सज्जावर पाठविण्याबाबत एका आठवड्यात कार्यवाही सुरू करावी तसेच शासनाने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी अन्यथा शासनाने दिलेल्या आदेशाचे अनुपालन केले नसल्या संबंधी आदेशात नमूद केलेनुसार शासनाकडे जिल्हाधिकारी परभणी यांच्या विरुद्ध म.ना.से वर्तणूक नियम १९७९ अन्वये प्रत्येक शासकीय कर्मचारी अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पालन करताना वर्तणूक विषयक नियम विहित करण्यात आलेले आहेत त्यानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यासंबंधी मागणी करण्यात येईल, तसेच आपण परभणी जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्या पासुन जिल्ह्यातील सर्व तलाठी यांच्यावर आपले नियंत्रण राहिले नसल्याचे निदर्शनास येत आहे यास आपले समर्थन आहे असे मला वाटते आपण परभणी जिल्ह्याचा पदभार स्वीकारण्यापुर्वी अशी परिस्थिती नव्हती हेही विशेष आहे, त्यामुळे शासनाने जिल्हाधिकारी कार्यालय परभणी येथे जे काही योजना राबविण्यासाठी आदेश दिले आहेत.
त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली किंवा नाही याबाबत शासनाकडे चौकशी करण्याची मागणी करण्यात येईल याची असे दिनांक ८ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी परभणी याना दिलेल्या निवेदन दिले असुन त्याची प्रत कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त, संभाजीनगर, तहसील जिंतूर यांच्याकडे संजय रामराव आडे (सामाजिक कार्यकर्ते जिंतूर) यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे

## पूर्णा नगरपालिकेतील दोन कर्मचारी चर्तुर्भूज- १० हजाराची लाच प्रकरण

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी :** वडिलांच्या संमतीपत्राच्या आधारे घराचे हस्तांतरण करण्याकरीता १० हजार रुपयांची लाच मागण्यासह स्विकारणाऱ्या पूर्णा नगरपालिकेतील नरहरी गोमाजी सातपुते या लिपीकासह रत्नदीप श्रीरंग वाघमारे या कंत्राटी संगणक ऑपरेटरला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या एका पथकाने मंगळवारी (दि.१३) मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले.



एका नागरीकाने त्यांच्या वडीलाचे संमतीपत्राच्या आधारे घराचे हस्तांतरण त्यांचे व भावाचे नावे करण्याकरीता ७ मे २०२५ रोजी रितसर अर्ज व कागदपत्रे पूर्णा नगरपालिकेस सादर केली. तेथील लिपीक नरहरी सातपुते यांची भेट घेवून त्या संबंधीची कल्पना दिली. परंतु, सातपुते यांनी हस्तांतराच्या कामाकरीता १० हजार रुपये द्यावे लागतील, असे स्पष्ट केले. लाच द्यावयाची इच्छा नसल्याने संबंधित नागरीकाने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. या खात्याच्या पथकाने या तक्रारीची ८ मे रोजी पंचासमक्ष पडताळणी केली तेव्हा लिपीक नरहरी सातपुते याने लाच रक्कम १० हजार रुपये स्विकारण्याची सहमती दर्शविली.

दरम्यान, या खात्याच्या पथकाने मंगळवारी पंचासमक्ष सापळा रचला, तेव्हा लिपीक नरहरी सातपुते यांनी सांगितल्याप्रमाणे कंत्राटी संगणक ऑपरेटर रत्नदीप वाघमारे हा १० हजार रुपयांची लाच स्विकारतांना पकडला गेला. या खात्याच्या पथकाने लगेचच सातपुते यासही ताब्यात घेतले. या दोघांची अंगझडती घेतली असता एक-एक मोबाईल जप्त करण्यात आला. दरम्यान, या दोघांच्याही घरांची झडतीची प्रक्रिया सुरु होती. पूर्णा पोलिस ठाण्यात या प्रकरणात त्या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्याचीही प्रक्रिया सुरु होती. दरम्यान, पोलिस अधिक्षक संदीप पालवे, अप्पर पोलिस अधिक्षक डॉ. संजय तुंगार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपअधिक्षक अशोक इप्पर, पोलिस निरिक्षक बसवेश्वर जक्कीकोरे यांच्या नेतृत्वाखाली सापळा पथकातील पोलिस निरीक्षक अलताफ मुलानी, सीमा चाटे, अतूल कदम, शेख जिब्राईल, शाम बोधणकर, कल्याण नागरगोजे, कदम, नरवाडे यांनी या कारवाईत सहभाग नोंदविला.

### जमजम कॉलनीत आगीत संसारोपयोगी साहित्य जळून खाक

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील जमजम कॉलनी येथील एका घराला आग लागून घरातील संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची घटना मंगळवारी (दि.१३) सकाळी सव्वातीन वाजण्याच्या सुमारास घडली.

शहरातील जमजम कॉलनी येथील शेख युनूस शेख सुलतान यांच्या घरात मंगळवारी सकाळी सव्वा तीन वाजेच्या सुमारास आग लागली. सरवर शेख यांनी या घटनेची माहिती तात्काळ अग्निशमन दलास दिली. माहिती मिळताच अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाला. अग्निशमन दलाच्या पथकाने ही आग आटोक्यात आणली, मात्र या आगीत घरातील संसार उपयोगी सर्व साहित्य जळून खाक झाले. महापालिकेचे सहाय्यक आयुक्त यांच्या नियंत्रणात प्रभारी अग्निशमन केंद्र अधिकारी डी. यु. राठोड यांच्या मार्गदर्शनात अग्निशामक जवान उमेश कदम, निखिल बेंडसुरे व वाहनचालक वसीम अखिल अहमद यांचा या पथकात सहभाग होता.

## श्री.भगवानबाबा विद्यालयात निकालाची उत्कृष्ट परंपरा

**मुलींनी यंदाही मारली बाजी...**



**जिंतूर,/प्रतिनिधी-** श्री भगवान बाबा विद्यालय केहाळ'' उत्कृष्ट निकालांची परंपरा कायम दहावीच्या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत सर्वांची मने जिंकली.
श्री भगवान बाबा विद्यालय केहाळ निकाल ९४.११% लागला असून प्राविण्यश्रेणीत ७ विद्यार्थी असून, द्वितीय श्रेणीत १६, एकूण ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.
१) प्रथम क्रमांक ८२.४०% घेऊन चिभडे गणेश याने मिळवला.
२) द्वितीय क्रमांक ७५.४० % घेऊन घुगे गंगासागर हिने मिळवला.
३) तृतीय क्रमांक ७३.४०% घुगे रूपाली हिने मिळवला.
श्री.त्र्यंबकेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ जिंतूर सचिव तथा श्री.भगवान बाबा विद्यालयाचे अध्यक्ष डॉ. गुलाबराव सांगळे व श्री भगवान बाबा विद्यालयाचे उपाध्यक्ष श्री.रामेश्वर सांगळे सर्व शिक्षकवृंद कर्मचारी यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या

# खाजगी ट्रॅव्हल्सधारकांकडून प्रवाशांची बेसुमार लुट

**परभणी ,/प्रतिनिधी-** दरवर्षीप्रमाणे उन्हाळी सुट्ट्या लागल्या बरोबर खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी तिकीटांच्या दरात आव्वा की सव्वा वाढ करीत प्रवाशांची बेसुमार लूट सुरु केली आहे.

प्रत्येक उन्हाळी सुट्ट्या असो, किंवा दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये खाजगी ट्रॅव्हल्स धारकांकडून तिकीटाच्या दरात आव्वा की सव्वा रक्कमेची वाढ केली जात आहे. त्याद्वारे, प्रवाशांची बेसुमार लूट खूलेआमपणे होत आहे. यावर्षीसुध्दा १ मे रोजी उन्हाळी सुट्ट्या जाहीर झाल्याबरोबर खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी मे व जून चा अर्धा महिना पूर्णतः कॅश करण्याकरीता चढाओढीने तिकीटांच्या दरात मोठी वाढ केली आहे.

विशेषतः महानगरांकडे जाणाऱ्या प्रवाशांना या तिकीट दरातील वाढीचा मोठा तडाखा बसतो आहे. परभणी ते पुणे प्रत्येक प्रवाशामागे ८०० ते ९०० रुपये हे सर्वसाधारणपणे तिकीटाचे दर आहेत. परंतु, या उन्हाळी सुट्टीत ट्रॅव्हल्स कंपन्यांनी १४०० ते १६०० रुपये असे प्रति प्रवाशामागे तिकीटांची दर आकारणी सुरु केली आहे. पुणे पाठोपाठ मुंबईचेही तिकीटांचे दर भडकले आहेत. सर्वसाधारणपणे मुंबईस जाण्याकरीता प्रवाशास आता २२०० ते २४०० रुपये मोजावे लागत आहे. शनिवार व रविवार तर हे दर आणखीनच भडकत आहेत. ऑनलाईन व ऑफलाईनच्या दरामध्ये मोठा फरक आहे.

खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी दररोजच हे दर टप्प्या टप्प्याने वाढविण्याचे धोरण अवलंबविले आहे. शनिवार व रविवार या दोन दिवसात तर पुणे असो, मुंबई, कोल्हापुर, नागपुर असो किंवा सुरतकडे जाणाऱ्या बसेसच्या दरांमध्ये प्रचंड वाढ केली जात आहे.

### भंगार बसेस पुन्हा धावताहेत रस्त्यावर...

**संपूर्ण उन्हाळी सुट्ट्यांचे सीझन कॅश करण्याकरीता ट्रॅव्हल्सधारकांनी भंगारात निघालेल्या बसेससुध्दा रस्त्यावर आणून धावण्याचे धोकादायक प्रकार अवलंबविले आहेत. परभणी शहरातून स्थानिक पातळीवरुन सर्वसाधारणपणे पुणे व मुंबई करीता ४० बसेस धावत आहेत. प्रवाशांची गर्दी ओळखून या कंपन्यांनी मोडकळीस निघालेल्या बसेस रस्त्यावर आणून धोकादायक पध्दतीने सुरु केल्या आहेत. त्यामुळे या भंगारात निघालेल्या बसेसमधून ग्राहकांचे मोठे हाल होत आहेत.**

## आरटीओ चिडीचूप : तिकीटाचे दर आव्वा की सव्वा

**उन्हाळी सुट्ट्या पूर्णतः कॅश करण्याचा संकल्प खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी सोडला असून नियमित बसेस सोडणाऱ्या कंपन्यांनी आता आपल्या ताफ्यात प्रवाशांची गर्दी ओळखून मोडकळीस निघालेल्या बसेससुध्दा दाखल करीत त्यांच्याद्वारे प्रवाशांची लूट सुरु केली आहे. या बसेसमधून कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत. विशेषतः निकृष्ट दर्जाची आसनव्यवस्था, मोडकळीस निघालेल्या खिडक्या तसेच हालणारे डुलणारे आसन, मळकट, कळकट गाद्या व त्यांचे कव्हर असे वाईट अनुभव प्रवाशी मूकपणे सहन करत आहेत. परंतु, त्याचे सोयरसुतक सरकारी यंत्रणेस नाही, हे दुर्देव आहे. प्रवाशीसुध्दा कुठेही तक्रार न करता निमूटपणे पैसे मोजून कसबसा पल्ला गाठण्याचा धोकादायक प्रयत्न करीत आहेत.**



## सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयातून अंतरा अजमेरा प्रथम



कन्नड :- दि.१४ मे - शहरातील सावित्रीबाई बाई फुले कन्या विद्यालय येथे इयत्ता १० वी वर्गात अंतरा रवींद्र अजमेरा हिने ९१ टक्के गुण मिळवून विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकवाला आहे.८९.८० टक्के गुण मिळवून राधिका गणेश गावंडे द्वितीय स्थानी तर ८९.२० टक्के गुण मिळवून विनायक प्रकाश पाडसवान याने तृतीय क्रमांक पटकवाला आहे. उज्वल यशाची परंपरा राखत विद्यालयाचा यंदाही निकाल ९३ टक्के लागला असून १०४ पैकी २९ विद्यार्थी विशेष प्रवीण्यांसह उत्तीर्ण झाले आहेत.यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष मानसिंग पवार, सेक्रेटरी अशोक आण्णा आहेर,उपाध्यक्ष डॉ. पी.के. निकम,डॉ.डी. डी. शिंदे,कोषाध्यक्ष चंद्रकांत आण्णा देशमुख,शालेय समितीचे अध्यक्ष बाबासाहेब मोहिते,डॉ.ए.के.महाले, आप्पासाहेब देशमुख,अन्वर खान,कृष्णा पाटील,प्राचार्य डॉ.व्ही.एन.भोसले,डॉ. रुपेश मोरे,विलास पवार,मुख्याध्यापिका सुनीता दळवी,सुभाष गोरे,जयश्री सोनार,संजय जाधव,विजय भोसले,पुरुषोत्तम बागुल,हरिचंद्र शेवरे,मीनाक्षी पाटील,गणेश दारवंटे,संजय त्रिभुवन,अजित खंबाट,निलेश देशमुख,ज्योती बिरारे, नारायण पूजरोड, आबा पवार, संजय गोरे आदींनी अभिनंदन केले आहे.

## जिल्हाध्यक्ष पदी संजय खंबायते यांची वर्णी



कन्नड: दि.१४ मे- भारतीय जनता पक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदी संजय खंबायते यांची दि. १३ मंगळवार रोजी फेर निवड करण्यात आली लोकशाही पद्धतीने सर्व तालुका अध्यक्षांच्या व पदाधिकाऱ्यांकडून ही निवड करण्यात आली असून तसे निवडीचे पत्र त्यांना प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले या निवडीबद्दल त्यांचा कन्नड तालुक्याच्या पदाधिकाऱ्यांकडून सत्कार करण्यात आला. यावेळी कन्नड तालुकाअध्यक्ष सुनील पवार, ललित सुरासे, घुगे, भाजप पदाधिकाऱ्यांची व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती

## श्रद्धा कपूरची ब्रँड ॲम्बेसडर म्हणून नियुक्ती

छत्रपती सभाजीनगर - आरोग्य आणि स्वच्छता उद्योगातील भारतातील आघाडीची कंपनी युरेका फोर्बज् लिमिटेडने त्यांच्या प्रतिष्ठेच्या व्हॅक्युम क्लिनर्सच्या श्रेणीसाठी अभिनेत्री श्रद्धा कपूरला ब्रँड ॲम्बेसडर म्हणून घोषित केले आहे. चार दशकांहून अधिक काळ लाखो भारतीय घरांमध्ये विश्वासार्हतेने सेवा देणाऱ्या या कॅटेगरी लीडरच्या या सहयोगामुळे युरेका फोर्बज्च्या स्वच्छता आणि आरोग्यदायी जीवनशैलीसाठी घेतलेल्या वचनबद्धतेत महत्त्वपूर्ण टप्पा गाठण्यात आला आहे. व्हॅक्युम क्लिनिंगच्या क्षेत्रात बाजारपेठेतील अग्रणी आणि चार दशकांहून अधिक काळ जपलेल्या परंपरेसह युरेका फोर्बज्ने भारतीय घरांमध्ये नेहमीच अत्याधुनिक गृह स्वच्छता तंत्रज्ञान आणले असून त्याला अतुलनीय सर्व्हिस नेटवर्कचा आधार आहे.

## सोनी सबवर लवकरच सुरू होत आहे 'उफ्फ ये लव है मुश्किल

विनोद, रोमान्स आणि कौटुंबिक नाट्य यांचे मिश्रण असलेली 'उफ्फ ये लव है मुश्किल ...' ही मालिका त्यातील वेधक कथानकाने प्रेक्षकांचे लक्ष नक्कीच वेधून घेईल. या मालिकेच्या केंद्रस्थानी आहे कैरी शर्मा, जिची भूमिका आशी सिंह करत आहे. कैरी शर्मा एक महत्त्वाकांक्षी आणि होतकरू तरुण वकील आहे. युग (शब्बीर अहलूवालिया) तिच्या आयुष्यात येतो तेव्हा तिच्या जीवनात उलथापालथ होते. स्वतःला सिद्ध करण्यासाठी धडपडणाऱ्या, होतकरू वकीलाची भूमिका आशीने खूप गंभीरतेने घेतली आहे. तिचे चित्रण अस्सल वाटावे यासाठी कायदेविषयक शोज तिने बारकाईने पाहिले. क्लासिक कोर्टरूम शोजपासून कोरियन-कोर्टरूम ड्रामापर्यंत तिने सर्व काही पाहिले आहे.

## आईकू नियो १० लवकरच लॉंच होणारवी

दिल्ली : उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू आता मोबाइल गती आणि कामगिरीला एका नवीन स्तरावर घेऊन जाणार आहे. कंपनी २६ मे २०२५ रोजी भारतात आपला नवीन स्मार्टफोन आईकू नियो १० लॉंच करणार आहे. आईकू नियो १० विशेषतः मल्टीटास्किंग तरुणांसाठी आणि नवीन करिअर व्यावसायिकांसाठी डिझाइन केलेले आहे. हा भारतातील त्याच्या सेगमेंटमधील सर्वात वेगवान स्मार्टफोन आहे, जो ड्युअल चिप पॉवरसह फ्लॅगशिप-स्तरीय कामगिरी, नाविन्य आणि वेग प्रदान करतो. आईकू नियो १० हा भारतातील पहिला स्मार्टफोन आहे ज्यामध्ये स्नॅपड्रॅगन ८ एस जेन ४ प्रोसेसर आहे, जो फ्लॅगशिप-ग्रेड वेग आणि कार्यक्षमता प्रदान करतो. हे आईकू च्या विशेष सुपरकॉम्प्युटिंग चिप क्यू१ द्वारे देखील समर्थित आहे, जे त्याला २.४२ दशलक्ष पेक्षा जास्त बेंचमार्क स्कोअर साध्य करण्यास सक्षम करते - या विभागातील कामगिरी पुन्हा परिभाषित करते.

## शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेडने रु २५,000 दशलक्ष महसुलाचा टप्पा पार केला

पुणे - शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेड ने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि आर्थिक वर्षासाठी आर्थिक निकाल जाहीर केले. शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेडचे चेअरमन, श्री. दिनेश पाटीदार यांनी कंपनीच्या कामगिरीवर भाष्य केले, आम्हालाआर्थिक वर्ष२५ मध्ये उल्लेखनीय आर्थिक कामगिरी नोंदवल्याचा आनंद आहे, जी सर्व प्रमुख निर्देशांकांमध्ये मोठ्या वाढीने चिन्हांकित झाली आहे. आम्ही आमचा आतापर्यंतचा सर्वाधिक महसूल रु २५,१६२ दशलक्ष नोंदवला, ज्यामध्ये ८३.६% ची वार्षिक वाढ झाली, तर पॅट उल्लेखनीयपणे १८८.२% ने वाढून रु४,०८४ दशलक्ष झाला. ही प्रभावी टॉपलाइन वाढ आमच्या देशांतर्गत तसेच निर्यात व्यवसायातील मजबूत कामगिरीमुळे झाली,

## स्वप्ने पूर्ण करण्यासाठी अनेकदा वेळ, समर्पण आणि चिकाटीची गरज

स्वप्ने पूर्ण करण्यासाठी अनेकदा वेळ, समर्पण आणि चिकाटीची गरज असते - आणि अभिनेत्री रचना मिस्त्रीने हल्लीच आपले एक स्वप्न सत्यात उतरवले. झी टीव्हीवरील प्रेरणादायी मालिका 'जागृति - एक नयी सुबह'मध्ये जागृतिची भूमिका साकारणाऱ्या रचनाने हल्लीच एक नवी कोरी करकरीत गाडी खरेदी केली आहे.हा महत्त्वाचा टप्पा केवळ मटेरियल यशाच्या निश्चितच पलीकडे जातो. यातून तिची कलेबद्दलची उत्कटता, अथक परिश्रम आणि वर्षांची कठोर मेहनत प्रतीत होते. रचनाने विकत घेतलेली कॉम्पॅक्ट एसयुव्ही ही तिच्या बोल्ड डिजाईन आणि सुविधेसाठी मानली जाते, रचनासाठी त्या गाडीचा सखोल अर्थ आहे. ही तिच्यासाठी वैयक्तिक विकास, स्वतंत्रता आणि यशाचा संकेत आहे. आपली गाडी विकत घेण्याचे स्वप्न दीर्घकाळ उराशी बाळगलेल्या व्यक्तीसाठी ती घरी ड्राईव्ह करून नेणे केवळ रोमांचक नव्हे तर अतिशय भावुक करणारेही आहे.

# प्रगत विज्ञान-तंत्रज्ञानातील शोध याचे मूळ समृद्ध इतिहास आणि सांस्कृतिक परंपरेत : डॉ. वि. ल. धारूरकर यांचे मत

### विद्यापीठातील इतिहास विभागात 'ऑन जॉब ट्रेनिंग आणि कौशल्य विकास'वरील व्याख्यान रंगले

संभाजीनगर/प्रतिनिधी

प्रगत विज्ञान आणि तंत्रज्ञानातील शोध हे समृद्ध इतिहास आणि सांस्कृतिक परंपरांतून प्रकट होतात. त्या आधारे प्रगत शास्त्रीय अभ्यास करून तंत्रज्ञानाचा विकास केला पाहिजे, असे मत माजी कुलगुरू व प्रसिद्ध विचारवंत डॉ. यांनी सोमवारी, १२ रोजी येथे व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास आणि प्राचीन भारतीय संस्कृती विभागात 'ऑन जॉब ट्रेनिंग आणि कौशल्य विकास' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. पुष्पा गायकवाड होत्या.

डॉ. धारूरकर म्हणाले, अल्बर्ट आईन्स्टाईन यांनी असे प्रतिपादन केले होते की, मानवी विकासाचे कितीही प्रयत्न झाले असले तरी आपण अजूनही नवे शोध आणि नव्या कल्पनांच्या विकासाबाबत कमालीचे दरिद्री आहोत. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी भारतात तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला व त्या आधारे विदेशात व्याख्याने दिली. त्यांनी असे मत मांडले होते की, जेथे प्राचीन तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास होतो, तेथेच प्रगत तंत्रज्ञानही जन्माला येते. आपल्या प्रतिभाशक्तीचा उपयोग आपणास अत्यंत कल्पकतेने आणि चतुराईने करावा लागेल. तसे झाले तरच कौशल्याचा विकास होणे शक्य आहे. महात्मा गांधी यांनी बिर्ला भवन येथे १९३७ साली केलेल्या एका भाषणात असे सांगितले होते की, भारताचे उज्वल भवितव्य कशात असेल तर ते कौशल्य विकासात आहे. त्यामुळे नव्या शैक्षणिक धोरणात शालेय जीवनापासूनच कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे.

**सामाजिक शास्त्रे तप्त मुशीतून विकसित**

सामाजिक शास्त्रांमध्ये कौशल्ये कुठे आहेत, असा प्रश्न लोक विचारतात तो चुकीचा गैरसमज आहे असे सांगून डॉ. धारूरकर पुढे म्हणाले, सर्व सामाजिक शास्त्रांना कौशल्याचे अंग आहे. किंबहुना सामाजिक शास्त्रे ही सामाजिक अनुभवाच्या तप्त मुशीतून विकसित झाली आहेत. त्यामुळे इतिहासासारख्या सामाजिक शास्त्राचा संबंध पुरातत्त्व विद्या, पर्यटन, उदार कला या ज्ञानशाखांशी आहे. पुरातत्त्व संशोधनामध्ये गावोगावी केले जाणारे सर्वेक्षण असो किंवा प्राचीन स्थळांचे अध्ययन असो, याबाबतीत पर्यटनासारख्या क्षेत्रात सुद्धा पुरातत्व विद्येचा आणि इतिहासाचा संबंध येतो.

**वस्तूसंग्रहालये देशाचे भूषण**

जगातील सर्व देशांमध्ये वस्तूसंग्रहालये ही एक इतिहासावर आधारलेली ज्ञानशाखा उदयास आली आहे. चांगली वस्तूसंग्रहालये ही त्या देशाचे भूषण असतात. त्या आधारे मोठ्या रोजगार संधी उपलब्ध होत आहेत. जुन्या ऐतिहासिक स्थळांमध्ये लेणी मंदिरे, किल्ले, गडकोट यांची माहिती देण्यासाठी चांगले मार्गदर्शक किंवा गाईड यांची कमतरता आहे. त्याचे प्रशिक्षण घेऊन उत्तम रोजगार मिळू शकतो, असे धारूरकर म्हणाले. या सर्व कौशल्यांच्या विकासासाठी ऑन जॉब ट्रेनिंगची नितांत गरज आहे. ऑन जॉब ट्रेनिंग मधूनच सातत्याने त्यांची निष्णातता विकसित होते. अलीकडे उदार कला शिक्षणातसुद्धा ऑन जॉब ट्रेनिंगला अत्यंत महत्त्व दिले जात आहे. पर्यटन क्षेत्रातील विविध विद्याशाखांचा विकास याच दिशेने होत आहे. विशेषत: अतिथी उद्योग असो किंवा पर्यटन क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञानाचे नवनवे बदलते स्वरूप असो या सर्व बाबतीत प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि सांस्कृतिक अनुभवाचा सहभाग याला विशेष महत्त्व आहे असे सांगून डॉ. धारूरकर यांनी पुरातत्त्व पर्यटन तसेच नाणेशास्त्र आणि म्युझियालॉजी इत्यादी शास्त्रांची उपयुक्त माहिती दिली. पुरातत्त्वाप्रमाणेच या नव्या ज्ञानशाखांत असलेल्या रोजगारांसाठी मनुष्यबळाची अत्यंत कमतरता असून, देशाचा संपन्न सांस्कृतिक वारसा पाहता अशा मनुष्यबळ विकासासाठी ऑन जॉब ट्रेनिंगचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग मोठ्या निष्ठेने करत असल्याबद्दल त्यांनी इतिहास विभागाचे कौतुक करून प्रशंसोद्गार काढले.

**प्रश्नोत्तराने यशस्वी सांगता**

प्रश्नोत्तरानंतर कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली. याप्रसंगी झालेल्या चर्चेमध्ये निवृत्त सेवा योजन अधिकारी शिरसाठ, पूनम कुशेर, अश्विन जोगदंड, डॉ. संदेश कांबळे, प्रसेनजित मानवर इत्यादी सहभागी झाले होते. प्रास्ताविक डॉ. बिना सेंगर यांनी केले. डॉ. संजय पाईकराव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. पुष्पा गायकवाड यांनी डॉ. धारूरकरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णमाला म्हस्के यांनी, तर प्रा. राहुल बचाटे यांनी सर्वांचे आभार मानले.

# पारमितांचा घाट : जीवनाच्या पूर्णतेची अनुभूति देणारी संगीत मैफल संपन्न

### एमजीएम विद्यापीठात बुद्धपौर्णिमेचा सोहळा संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.१४ : ज्यांनी राग-द्वेष-मोहावर विजय प्राप्त करून जगाला परिशुद्ध जीवनाची अनुभूति दिली त्या भगवान गौतम बुद्धांच्या जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण या तीनही घटनांची साक्ष असलेल्या बुद्धपौर्णिमेनिमित्त 'पारमितांचा घाट' ही एमजीएम विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली विशेष संगीत मैफल मोठ्या थाटात आणि श्रोत्यांच्या उदंड प्रतिसादात संपन्न झाली. विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात संपन्न झालेल्या या संगीत मैफलीचे उद्घाटन पोलीस उपायुक्त नितीन बगाटे (भा. पो. से.) यांच्या हस्ते झाले. सुरुवातीला पाहुण्यांच्या हस्ते तथागताच्या मूर्तीस पुष्पार्पण करण्यात आले. याप्रसंगी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, सौ.अनुराधाताई कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, अर्थतज्ञ प्रा. एच. एम. देसरडा आणि सौ. सुमन बगाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

एमजीएम विद्यापीठात कला, संस्कृती आणि तत्वज्ञानाची जपणूक केली जाते ही अत्यंत प्रशंसनीय बाब आहे. गौतम बुद्धांच्या गीतांची शास्त्रीय संगीतावर होणारी 'पारमितांचा घाट' ही संगीत मैफल अत्यंत आगळी-वेगळी असून ती नव्या संस्कृतीची उभारणी करणारी असल्याचे प्रतिपादन पोलीस उपायुक्त नितीन बगाटे यांनी यावेळी केले.

गोरगरीब विद्यार्थ्यांना विद्यार्जनासाठी सुविधा देणाऱ्या बहुजनहिताय वस्तीगृहाला कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते एक लाखाची मदत करून दान पारमितेची पूर्ततादेखील या वेळी करण्यात आली.

ज्ञानप्राप्तीनंतर दिलेल्या आपल्या पहिल्या प्रवचनात ज्या तीन सुत्रांची म्हणजेच पंचशील, अष्टांग मार्ग आणि पारमिता यांची देशना बुद्धांनी केली त्यावरच प्रस्तुत मैफलीचे सादरीकरण होते. दहा पारमिता या मनुष्याच्या जीवनाला पूर्णत्वाची अवस्था प्राप्त करून देणाऱ्या आहेत हे मध्यवर्ती सूत्र ठेऊन प्रोफेसर संजय मोहड यांनी या विशेषसंगीत मैफलीची निर्मिती केली. आपल्या विज्ञाननिष्ठ निरूपणातून आणि आशयगर्भगीत-संगीत रचनांमधून त्यांनी याची अनुभूति देखील श्रोत्यांना दिली.

मेधा लखपति, विद्याधनेधर आणि उत्कर्षा बोचरे या विद्यार्थीनी कलावंतांनी दमदार गायन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या मैफलीत सादर झालेल्या त्रिसरण पंचशील (शुद्ध कल्याण), करिते पूजा मी (यमन), सारी भारतभूमी (भीमपलास), आले विहारी (दुर्गा), भजन हे तारी (शिवरंजनी), नगरीच्या नारी (मिश्र पहाडी) आणि पारमितांचा घाट (मालकंस, भैरवी) या रचनांनी श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेतला. या संगीत मैफलीत श्री. धीरेंद्र गावंडे (तबला), श्री. पंकज शिरभाते (व्हायोलिन), श्री. निरंजन भालेराव (बासरी), श्री. राहुल जोशी (सहतालवाद्य) आणि श्री. बंकट बैरागी (पखवाज) यांनी अत्यंत समर्पक आणिसुरेख साथसंगत केली.या विशेष संगीतमैफलीसाठी जाणकार श्रोत्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन एमजीएम स्कूल फिल्म आर्ट्सचे प्रमुख प्रा. शिव कदम यांनी केले.

# सोलापूरच्या शेंगा चटणी, ज्वारीची कडक भाकरी दुबईत निर्यात होणार

### दातार यांच्या अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स समूहातर्फे खरेदी करण्याची तयारी



छत्रपती संभाजीनगर : मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी महाराष्ट्रातील नवउद्योजकांची उत्पादने दुबईसह संयुक्त अरब अमिरातीत निर्यात करण्यासाठी मदतीची तयारी दाखवली आहे. दुबईच्या उंबरठ्यावरुन जागतिक बाजारपेठेत व्यवसाय वाढवण्यास इच्छुक असलेल्यांना मनापासून मार्गदर्शन करणार असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

सोलापूर येथील आमदार सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक व्यावसायिकांच्या शिष्टमंडळाने नुकतीच धनंजय दातार यांची येथे भेट घेऊन त्यांच्यापुढे सोलापूरच्या शेंगा चटणी, ज्वारीची कडक भाकरी, उत्कृष्ट दर्जाची ज्वारी, तांदूळ व डाळी अशा कृषी उत्पादनांचे सादरीकरण केले. एका बॅग उत्पादकाने नावीन्यपूर्ण पॅकेजिंग सोल्यूशन्सही सादर केली. दातार यांनी या सर्वांच्या गुणवत्तेचे कौतुक केले व काही उत्पादने आपल्या अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स समूहातर्फे खरेदी करण्याची तयारीही दाखवली.

भारतातून दुबईत उत्पादने निर्यात करण्यासाठीची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, कायदेशीर तरतुदी, दर्जा व पॅकेजिंगसंबंधी नियम तसेच व्यवसायाचे विपणन करताना घ्यायची काळजी अशा विविध पैलूंवर दातार यांनी या शिष्टमंडळाला मार्गदर्शन केले. ते म्हणाले, भारतातून आखाती देशांत विशेषतः संयुक्त अरब अमिरातीत होणारी निर्यात मुख्यतः सागरी वाहतुकीद्वारे होते आणि ती स्वस्त असते. मात्र या प्रवासाला साधारणतः २० दिवस लागत असल्याने शेल्फ लाईफ अत्यल्प असलेली नाशवंत उत्पादने विचारात घेऊ नयेत. किमान सहा महिने ते वर्षभर टिकणारी उत्पादने निवडावीत. आम्ही आमच्या सुपर स्टोअर्सच्या साखळीद्वारे आखाती बाजारपेठेत शुद्ध, स्वच्छ व अस्सल उत्पादने पुरवतो. हल्ली सेंद्रीय उत्पादनांवर ग्राहकांचा विशेष भर आहे. उत्पादनांचे पॅकेजिंग सुरक्षित व टॅम्परप्रूफ असावे. आम्ही आमच्या पिकॉक ब्रँडअंतर्गत अलिकडे पौष्टिक खपली गहू सादर केला. त्याला येथील ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. त्याच धर्तीवर नैसर्गिक, रसायनमुक्त, भेसळमुक्त व आरोग्यदायी कृषिउत्पादने व खाद्यउत्पादने पाठवल्यास उत्पादकांनाही समाधानकारक आर्थिक फायदा मिळेल.

भेसळ, ग्राहकांचे नुकसान, फसवणूक किंवा अनारोग्यकारक उत्पादनांबाबत आखाती देशांचे धोरण व कायदे कडक असल्याने निर्यातदाराने काटेकोर राहण्याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सूचित केले.

या शिष्टमंडळात आमदार देशमुख यांच्याखेरीज सोलापूर गार्मेन्ट्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे संचालक अमित जैन, उद्यम पीएएचएसयूआय फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेश गुराणी, अल्पेश संकलेचा, विजय पाटील, यश जैन, प्रदीप जैन, आनंद झाड आणि चंद्रशेखर जाधव आदींचा समावेश होता.

## माणिकराव पालोदकर शाळेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



फर्दापूर दि १४ फर्दापूर येथील माणिकराव पालोदकर माध्यमिक शाळेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेतील शिक्षक व विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री अब्दुल सत्तार सचिव समीर भैय्या, प्रशासकीय अधिकारी रईस सर यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## भागीरथी शाळेतुन प्रतिक्षा गाडे प्रथम



पैठण दि १४ :-तालुक्यातील भागीरथी स्त्री शिक्षण विद्यामंदिर शाळेतुन प्रतिक्षा शिवाजी गाडे या विद्यार्थीनींने ९४.४०% टक्के गुण मिळवून प्रथम येण्याचा बहुमान मिळाला. त्यासोबतच भागीरथी विद्यालयाचा १००% निकाल लागला असुन दहावीतील ४२ पैकी ४२ विद्यार्थी चांगल्या मार्कानेे गुणवत्ता यादीत समावेश झाल्याची माहिती मुख्याध्यापक श्रीमती जलकन्या काळे गोरे यांनी दिली. विद्यालयातुन प्रतिक्षा शिवाजी गाडे ९४.४०% प्रथम, अमृता सोपान आहेर ९१.८०% द्वितीय, प्रतिक्षा पांडुरंग मैंदड ९१.२०% तृतीय, आरती नवनाथ पोकळे ८९.४०% चतुर्थ यांनी विशेष प्राविण्य मिळवले. शाळेतुन प्रथम क्रमांक आलेली प्रतिक्षा हि विद्यार्थीनी प्रहारचे जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार शिवाजी गाडे यांची मुलगी आहे.या यशाबद्दल भागीरथी विद्यालयातील सर्व शिक्षकांनी व वडवाळी गावकऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## सोयगाव येथील शोर्यल सोनवणे या विद्यार्थिनीने मिळवला दुसरा क्रमांक



सोयगाव,दि.१४ मे : श्रीकृष्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शेंदुर्णी ता.जामनेर येथे घेण्यात आलेल्या एस.एस.सी परीक्षेत शोर्यल अरूण सोहणी (सोनवणे)ह्या विद्यार्थीने ९४.२०% मिळवून दुसरा क्रमांक पटवला आहे.पहीला क्रंमाक ईशा सुर्यवंशी ९५.४०% हीने पटकला,शोर्यल अरूण सोहणी ही सोयगाव ची रहिवासी असून ती सोयगाव शहरातील कृषी भूषण शेतकरी अरूण सोहणी यांची मुलगी आहे.या यशासाठी विद्यालयाचे अध्यक्ष डॉ. कौमुदी साने,मुख्याध्यापक मीरा इंगळे,वर्ग शिक्षक लक्ष्मण जाधव,शिक्षक किशोर कुळकर्णी, विजय लहासे,अजय सुर्यवंशी,प्रमोद सरोदे,स्वप्निल सरोदे,प्रशांत कुमार,ओव्हाल सोनवणे,प्रशांत पाटील,तसेच राजेद्र पाटील सरस्वती विद्यालय यानी मोलाचे मार्गदर्शन केले.तसेच टॉप टेन यादीत वैष्णवी विनोद चौधरी सोयगाव ९१.६०% तर दामिनी अनिल कळवत्रे सोयगाव ९०.८० % मिळवून स्थान मिळवले,या यशाचे बद्दल वडील अरूण सोहणी,आई शितल सोहणी,आजी सुनंदाबाई सोहणी,आजोबा श्रीराम सोहणी,विनोद सोहणी,भुषण सोहणी,मंगेश सोहणी यांनी कौतूक केले तसेच तिळवण तेली समितीचे अध्यक्ष राजू दुतोंडे,आरोग्यदुत डिगाबर वाघ,यानीही शुभेच्छा दिल्या व सोयगाव येथील सर्व मित्र मंडळी कडून विद्यार्थीनीचे कौतुक होत आहे.

## आयकॉनच्या अक्षदाला इंग्रजीत आऊट ऑफ १००



पैठण दि १५ : विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठान संचलित आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूल, पैठणची इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कुमारी अक्षदा अनिल दातीर ही इंग्रजी (प्रथम भाषा) विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात पहिली आली आहे.

टार्गेट पब्लिकेशनच्या वतीने इंग्लिश विषयात १०० पैकी १०० गुण घेऊन राज्यात प्रथम आल्याबद्दल दहावीची विद्यार्थ्यांनी अक्षदा दातीर व इंग्लिश विषयाचे शिक्षक बी.आर.पठाण यांचा सत्कार करण्यात आला. टार्गेट पब्लिकेशनचे आर . डी.कुलकर्णी रीजनल सेल्स मॅनेजर, राजू चव्हाण बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर यांनी आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूल, पैठण येथे येऊन अध्यक्ष संतोष तांबे मुख्याध्यापक आर. बी. रामावत, पालक (पिता) अनिल दातीर, आई स्वाती दातीर आणि विषय शिक्षकासह अक्षदा चा सत्कार केला.

## वसंतराव हिंगोलीकर यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - संग्राम नगर, बीड बायपास येथील रहिवासी वसंतराव वैजनाथराव हिंगोलीकर (८८) यांचे आज दि.१४ मे रोजी सकाळी पहाटे ३.३० वाजता निधन झाले. त्यांच्यावर सकाळी ११ वाजता प्रतापनगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर**

सिव्हिल एम ए. क्र ३८४/२०२५

अर्जदार :- १) छाया भ्र. रामचंद्र मनाळ वय ५२ वर्ष धंदा: घरकाम रा. वाहेगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर २) प्रियंका भ्र. रामकिशान गायकवाड वय: ३३ वर्ष धंदा: घरकाम रा. पानवी बुद्रुक ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन VIII 1827 प्रमाणे वारस प्रमाणपत्र लीगल हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲडभोकरे जी.एस., गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं १ चे पती व अर्जदार नं २ चे वडील नामे रामचंद्र दत्तू मनाळ हे मौजे. वाहेगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते व ते दिनांक २१/०२/२०२५ रोजी पुणे येथे उपचारा दरम्यान हार्ट केअर रिसर्च इंस्टीट्यूट पुणे येथे मयत झाले असून अर्जदार नं १ ही मयत रामचंद्र दत्तू मनाळ यांची पत्नी असून अर्जदार नं २ ही मुलगी आहे मयत रामचंद्र दत्तू मनाळ यांना अर्जदार नं १ व २ शिवाय इतर कोणीही वारस नाही. तसेच मयत रामचंद्र दत्तू मनाळ यांचे वडील नामे दत्तू भानूदास मनाळ हे दिनांक ०१/०४/२००७ रोजी मयत झालेले आहे तसेच रामचंद्र दत्तू मनाळ यांची आई नामे भागीरथीबाई दत्तू मनाळ या दिनांक २५/०३/२०१६ रोजी मयत झालेले आहे.

करीता उपरोक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहेत्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की., अर्जदारांच्या प्रस्तुत प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेपउजर या न्यायालयात-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप व्यक्तीश अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यानी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहिर प्रगटण माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १४/०५/२०२५ रोजी

कनिष्ठ लिपीक

सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## अग्रलेख...

# मोदींच्या संबोधनाचा अन्वयार्थ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी रात्री समस्त भारतीयांना संबोधित करताना वापरलेली भाषा ही निर्णायक, स्पष्ट, कठोर होती आणि तेवढीच पाकिस्तानचा थरकाप उडवणारी होती. यापूर्वी भारतावर अनेकदा दहशतवाद्यांचे हल्ले झाले. स्फोट घडवून आणले गेले. तत्कालीन पंतप्रधानांची त्यानंतर जनतेला दिलासा देणारी भाषणेही झाली. परंतु, 'ऑपरेशन सिंदूर'च्या पृष्ठभूमीवर, विशेषतः शस्त्रसंधी झाल्यावरचे पंतप्रधान मोदी यांचे संबोधन हे सर्वार्थाने ऐतिहासिक होते. त्यांनी केवळ पाकिस्तानलाच सुनावले नाही तर जागतिक समुदायालाही इशारे दिले. आमच्या बहिणींच्या कुंकवाला हात लावणाऱ्यांना आम्ही सोडणार नाही, असा इशारा एकीकडे आणि शक्तिशाली असणे ही शांततेची पूर्वअट आहे, ही तात्त्विक मांडणी दुसरीकडे, असा त्यांच्या संबोधनाचा बाज होता. एकप्रकारे ते जगाला संबोधित करीत होते. त्यांच्या संपूर्ण मांडणीतून भारत आता पूर्वीसारखा दहशतवाद्यांचे थैमान सहन करणारा देश राहिलेला नसून, त्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देणारा देश बनला आहे, हे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारतीय लष्कराने पाकिस्तानला जो काही धडा शिकविला, त्याचा संबंध दहशतवाद्यांच्या क्रौर्याशी तर होताच; शिवाय तो पाकिस्तानला भारताचे सामर्थ्य नेहमीसाठी लक्षात राहावे, यासाठीही होता. यापूर्वी असे कधीच झाले नव्हते की, भारताने दहशतवादी हल्ल्याचे प्रत्युत्तर देण्यासाठी थेट पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले आणि त्या देशाची इतर प्रकारची हानी करतानाच असंख्य आतंक्यांना यमसदनी पाठविले. आम्ही भारतीय सैन्याला दहशतवाद्यांच्या विरोधातील कारवाई करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिले होते... आणि आता प्रत्येक दहशतवाद्याला, प्रत्येक दहशतवादी संघटनेला आमच्या आया-बहिणी आणि कन्यांच्या सौभाग्याशी खेळ केला तर काय परिणाम होतात, हे लक्षात आलेले आहे, असे पंतप्रधान म्हणाले. या वाक्याचा अन्वयार्थ असा आहे की, भारताला आता कुणीही डिवचले तर तो शांत बसणार नाही. पाकिस्तान रात्री जिहादला पाठिंबा देतो आणि दिवसा शांततेची भाषा बोलतो, हे साऱ्या दुनियेला ठाऊक आहे. असा फसवा डाव भारत आता सहन करणार नाही, हेच पंतप्रधानांनी सांगितले आहे.

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत सीमावर्ती भाग आणि व्याप्त काश्मिरातील दहशतवाद्यांचे अड्डेच नव्हे, तर त्या पलीकडे विमानतळ नष्ट करण्याचा पराक्रम भारतीय सैन्याने गाजविला. भारताच्या लष्करी सिद्धतेत, सामर्थ्यात आणि रणनीतिक क्षमतेत किती वाढ झालेली आहे, याचे प्रतिबिंब या पराक्रमात दिसले. भारतीय लष्कराची बौद्धिक, मानसिक क्षमताही जगाने पाहिली. पाकिस्तानच्या आंतरिक भागात झालेले भारताचे क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले या केवळ लष्करी कारवाया नव्हत्या; तो तत्काळ केला गेलेला न्याय होता. तो दहशतवाद्यांना तडाखा तर पाकिस्तानच्या सरकारसाठी धडा होता. भारतीय सैन्याने बहावलपूर आणि मुरीदके येथील दहशतवाद्यांचे सुरक्षित अड्डे उद्ध्वस्त केले. ही जागतिक दहशतवादाची विद्यापीठे आणि नरसंहाराची प्रशिक्षण स्थळे भारताने नष्ट केली. त्या तुलनेत पाकिस्तानचे प्रत्युत्तर, जे देण्याचे कोणतेही नैतिक कारण आजही त्या देशाला सांगता येणार नाही, अगदीच पुचाट होते. त्यांचे मिसाईल्स, ड्रोन्स सगळे भारतीय लष्कराने हवेतल्या हवेतच ध्वस्त करून टाकले. ७२ तासांच्या आत भारताच्या हल्ल्यात पाकिस्तानचे महत्त्वाचे हवाई तळ नष्ट झाले. पाकिस्तानचा लष्करी अहंकार साफ चेपला गेला. 'हा एक नवीन भारत आहे. आम्ही दहशतवाद्यांना शोधून संपवितो. आम्ही त्यांची वाट पाहत नाही', हे शब्द केवळ पाकिस्तानसाठी नव्हे, तर भारताकडे वाकडी नजर करू पाहणाऱ्या जगातील इतर देशांसाठीही होते. आता भारत पाशवी तत्त्वांची थेट शिकार करेल. केवळ प्रतिक्रिया देणार नाही. भारत दहशतवादी छावण्या थेट नष्ट करेल, त्यांचा केवळ निषेध करणार नाही आणि जर पाकिस्तानला असे वाटत असेल की, अण्वस्त्रे ही त्या देशाची ढाल आहे, तर भारताचे धैर्य, बुद्धिमत्ता आणि नैतिकता हे त्याचे उत्तर आहे. आण्विक शक्तीच्या वापरासंबंधी ब्लॅकमेल करून पाकिस्तानकडून दहशतवाद्यांना समर्थन देणे खपवून घेतले जाणार नाही, असेही मोदींनी स्पष्ट केले. एका अर्थाने 'ऑपरेशन सिंदूर' हा दहशतवादाबद्दल 'झिरो टॉलरन्स'च्या नव्या नीतीचा जन्म आहे. हा एक लष्करी सिद्धांत आहे आणि तोच यापुढच्या काळात भारताची ढाल असेल, हाही मोदींच्या संबोधनाचा अन्वयार्थ आहे. गेल्या अनेक दशकांपासून पाकिस्तानच्या लष्कराने, सरकारने आणि आतंकवाद्यांनी भारताच्या विरोधात दहशतीचा खेळ मांडलेला आहे. शेकडो लहान-मोठे हल्ले झाले, स्फोट झाले, हजारो जीव गेले. भारताने प्रत्येक वेळी जगाचा शांतिपाठ ऐकून घेणे हीच दशकभरापूर्वीची रीत होती. आता नवा सामर्थ्यवान भारत शांतिपाठ तर ऐकवितोच आणि गरज असेल तर शांततेच्या प्रस्थापनेसाठी रट्टेही देतो, हे जगाने पाहिले. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर शांततेच्या बाता करायच्या आणि त्याच वेळी दहशतवाद्यांना भारताच्या विरोधात 'सामरिक उपकरणे' म्हणून पोसायचे, जिहादींना निधी द्यायचा आणि पुन्हा पाश्चात्त्यांकडे, जागतिक नाणेनिधीकडे, जागतिक बँकेकडे मदतीची याचना करायची इतका निलाजरेपणा पाकिस्तान आजवर करीत आला. यावेळी त्याचे हे स्वरूप पूर्णपणे उघडे पडले. पाकिस्तानी लष्कर हेच एकप्रकारे जिहादी लष्कर आहे आणि तेच दहशतवाद्यांना पोसते आहे, हे जगाला पूर्णपणे कळून चुकले. त्यामुळेच आताच्या स्थितीत आंतरराष्ट्रीय मदत पाकिस्तानला मिळू नये, असा सूरही जगात उठला. मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांच्या अन्त्ययात्रेचे आयोजन करण्याचे पातक तिथल्या सरकारी यंत्रणेने केले. त्याची छायाचित्रे जगात सर्वांनी पाहिली. पाकिस्तानची उरली सुरली इज्जत मातीत मिळाली. आता इतक्या दबंग पद्धतीने भारताने पाकिस्तानची मुजोरी संपविल्यावर पंतप्रधानांनी घेतलेली भूमिका फार महत्त्वाची आहे. यापुढे पाकिस्तानशी चर्चा होणारच असेल तर ती केवळ दहशतवाद आणि व्याप्त काश्मीरवर होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. आता निरर्थक बैठका आणि संवाद होणार नाहीत. चहापाणी होणार नाही आणि हवापाण्याच्या बाताही होणार नाहीत. भारताच्या संयमाची मर्यादा संपल्यामुळे मोदींनी आपल्या संबोधनातून पाकिस्तानसाठी रेड लाईन आखून दिलेली आहे. त्या रेषेचे उल्लंघन झाले की, आपले अस्तित्व संपुष्टात येईल, हे आता पाकिस्तानला समजले पाहिजे. एका हाताने दहशतवाद्यांना घास भरवणे आणि दुसऱ्या हाताने शांततेवर चर्चा करण्यासाठी आवतन देणे हा दोगलेपणा चालणार नाही, हेही पाकिस्तानच्या लक्षात यायला हवे. आंतरराष्ट्रीय समुदायानेदेखील आता या विषयाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे, हाही मोदींच्या संबोधनातील एक सूर होता. त्याचा अर्थ असा की, दक्षिण आशियात शांतता हवी असेल तर आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानकडे खोडकर मुलासारखे पाहू नये. ते खोडकर मूल नाही; तो बदमाशांचा, क्रूर दहशतवाद्यांचा देश आहे, हे जगाने लक्षात घेतले पाहिजे. शांततेचा मार्ग शक्तीच्या माध्यमातून जातो, असे मोदींनी स्पष्ट केले. याचा अर्थ असा की, भारत हा शांतताप्रिय देश आहे. शांततेचे महत्त्व भारताला कळते. परंतु आवश्यक असल्यास भारत संघर्ष करेल आणि अहंकारासाठी नव्हे तर शांततेचे रक्षण करण्यासाठी नैतिक पद्धतीने शक्तीचा वापर करेल. दहशतवादाला दंडित करण्यासाठी वापरली जाणारी शक्ती म्हणजेच न्याय होय, ही भारताची भूमिका आहे. त्यामुळेच पाकिस्तानने लक्षात घेतले पाहिजे की, यापुढे भारतात किंवा भारतीयांच्या बाबतीत असे काहीही घडले तर ऑपरेशन सिंदूर कोणत्याही टोकापर्यंत जाऊन पाकिस्तानला नमवू शकेल. एकुणात पंतप्रधानांनी भारतीयांना उद्देशून केलेले संबोधन हे जागतिक पातळीवर दखलपात्र ठरेल, इतके महत्त्वाचे आहे. भारताने दहशतवादाचा फार त्रास आणि जाच सोसला आहे. अन्याय सहन करण्याची मर्यादा संपते तेव्हा सोसणाऱ्याचा संयमही संपतो. भारताचा संयम संपला तेव्हाच ऑपरेशन सिंदूर सुरू झाले. आता शस्त्रसंधी झालेली असली, तरी ऑपरेशन सिंदूर बंद झालेले नाही. ते कोणत्याही क्षणी पुन्हा सुरू होऊ शकते आणि आता जर ते सुरू झाले तर दक्षिण आशियाचा इतिहास आणि भूगोल बदलल्याशिवाय थांबणार नाही, हेच मोदींनी या संबोधनात सांगितले. हा अन्वयार्थ समजून घेण्याची बौद्धिक क्षमता पाकिस्तानचे राजकारणी आणि लष्करशहा यांच्याकडे आहे की नाही, हा प्रश्न मात्र कायम आहे.

## विशेष

# शेतीच्या यांत्रिकीकरणाची वाढावी गती

**प्रा. सुखदेव बखळे**

वेगवेगळ्या राज्यांमधील शेतीमध्ये यंत्रांचा वापर वेगवेगळ्या पद्धतीने होत असतो. सामाजिक-आर्थिक परिस्थिती, भौगोलिक परिस्थिती, घेतलेली पिके आणि सिंचन सुविधा अशा अनेक घटकांवर तो अवलंबून असतो. भारतातील शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी आणि लहान शेतकऱ्यांना यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यासाठी सरकार कृषी यंत्रसामग्री बँक आणि कस्टम हायरिंग सेंटर योजना चालवत आहे. यामागील उद्देश असा की, जे लहान आणि सीमांत शेतकरी महागडी कृषी यंत्रे खरेदी करू शकत नाहीत, ते भाड्याने घेऊन शेती सोपी करू शकतात; पण प्रश्न असा पडतो की, ही यंत्रे खरोखरच शेतकऱ्यांच्या आवाक्यात आहेत का, ही योजना फक्त सरकारी अहवालांपुरती मर्यादित आहे? या प्रश्नाचा खोलात जाऊन विचार करावा लागेल. शेती सुलभ करण्यासाठी सरकारने २०२३ मध्ये 'फार्म मशिनरी बँक' (एफएमबी)/फार्म मशिनरी हब (एफएमएच) योजना सुरू केली. ही योजना 'फार्म मेकॅनायझेशन अंब्रेला योजनें'तर्गत आणण्यात आली. शेतकऱ्यांना कृषी यंत्रे भाड्याने देणे हा त्याचा उद्देश आहे. मशीन बँक उघडण्यासाठी सरकार आठ लाख रुपयांपर्यंत मदत देते. ती एकूण खर्चाच्या ८० टक्के असावी; पण एकूण खर्च किमान १० लाख रुपये असावा. या १० लाख रुपयांमध्ये मशीन, शेड, देखभाल आणि विम्याचा खर्च समाविष्ट आहे. उर्वरित २० टक्के पैसे स्वतः गुंतवावे लागतात. एकूण खर्चाच्या पाच टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम शेड बांधण्यासाठी खर्च करता येणार नाही आणि इतर किरकोळ खर्चांसाठी १० टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम खर्च करता येणार नाही.

अर्जदाराने एकूण खर्चाच्या किमान २५ टक्के रक्कम बँकेत मार्जिन मनी म्हणून जमा करणे आवश्यक आहे. उर्वरित रक्कम बँक कर्जाच्या स्वरूपात उपलब्ध असेल. सरकार स्वतः कोणतेही मशीन किंवा उपकरण खरेदी करणार नाही; परंतु लाभार्थीने खरेदी केलेल्या मशीनवरच अनुदान देईल. अनुदान थेट बँकेच्या अनुदान राखीव निधी/कर्ज खात्यात डीबीटीद्वारे हस्तांतरित केले जाते. सरकारी पोर्टलवर नमूद केलेल्या मशीन उत्पादक आणि डीलर्सकडून खरेदी केलेल्या मशीनवरच अनुदान उपलब्ध आहे. लाभार्थी किंवा त्याच्या/तिच्या जोडीदाराला मागील अनुदान मिळाल्यापासून चार वर्षांनीच नवीन अनुदानासाठी अर्ज करण्याची परवानगी आहे. सरकारने २०१४-१५ पासून कृषी यांत्रिकीकरण उप-मिशन (एसएमएएम) नावाची योजना सुरू केली आहे. ही योजना केंद्र सरकारची आहे; परंतु ती राज्य सरकारांमार्फत चालवली जात आहे. या योजनेत शेतकऱ्यांना कृषी यंत्रे आणि उपकरणे खरेदी करण्यासाठी आर्थिक



मदत दिली जाते. सरकारने २०१८-१९ पासून 'पीक अवशेष व्यवस्थापन' (सीआरएम) योजना सुरू केली आहे. एसएमएएम योजना सुरू झाल्यापासून २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सरकारने विविध राज्यांना ८११०.२४ कोटी रुपये दिले आहेत. राज्यांनी शेतकऱ्यांना १९.५१ लाखांहून अधिक यंत्रे आणि अवजारे दिली आहेत. वेगवेगळ्या राज्यांमध्ये ५२ हजारांहून अधिक 'कस्टम हायरिंग सेंटर्स' (सीएचसी), 'हाय-टेक हब्स' आणि 'फार्म मशिनरी बँक्स' (एफएमबी) उघडण्यात आल्या आहेत. २०१८-१९ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत खत व्यवस्थापन योजनेसाठी (सीआरएम) ३६०७.८८ कोटी निधी जारी करण्यात आला आहे. विशेषतः पीक अवशेष व्यवस्थापनासाठी ४१ हजार ९०० पेक्षा अधिक 'कस्टम हायरिंग सेंटर्स' (सीएचसी) स्थापन करण्यात आली आहेत. या 'सीएचसी' आणि वैयक्तिक शेतकऱ्यांना ३.२३ लाखांहून अधिक गवत व्यवस्थापन यंत्रे देण्यात आली आहेत. देशात शेतीमध्ये किती यंत्रसामग्री वापरली जात आहे आणि शेतकरी भाड्याने यंत्रसामग्री कशी घेत आहेत, हे जाणून घेण्यासाठी सरकार एक सर्वेक्षण करीत आहे. या सर्वेक्षणाद्वारे सरकारला शेतकऱ्यांना यंत्रांची किती गरज आहे आणि ते त्यांचा वापर कसा करीत आहेत हे कळेल. सर्वेक्षणाच्या निकालांच्या आधारे शेतीमध्ये यंत्रांचा वापर वाढविण्यासाठी नवीन योजना आखल्या जाऊ शकतात. 'भारतीय मानक ब्यूरो (बीआयएस) ने कृषी यंत्रसामग्रीसाठी २९६ नवीन मानके निश्चित केली आहेत. त्यांचे उद्दिष्ट चांगल्या, सुरक्षित आणि विश्वासार्ह मशिन्स प्रदान करणे आहे. या नियमांनुसार मशीन तपासण्याचे आणि प्रमाणपत्र देण्याचे काम केले जाते. सरकार फक्त अशाच मशिन्सना प्रोत्साहन देते ज्यांची या संस्थांमध्ये चाचणी झाली आहे. भारतात सरासरी ४७ टक्के शेतीची कामे यंत्रांद्वारे केली जातात. शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी यंत्रांचा वापर करण्यात अनेक अडचणी आहेत. आधुनिक यंत्रे खूप महाग असून चालवण्यास कठीण आहेत, असे लहान शेतकऱ्यांना वाटते. शेतकऱ्यांना यंत्रांच्या दुरुस्ती आणि देखभालीबद्दल ज्ञान नसल्यामुळे ते त्यांचा योग्य वापर करू शकत नाहीत. ग्रामीण भागात चांगले रस्ते, वीज आणि यंत्रांच्या सुटे भागांची उपलब्धता यासारख्या सुविधांचा अभाव आहे. मशीन दुरुस्त करण्यासाठी आणि माहिती देण्यासाठी तंत्रज्ञांची कमतरता आहे. शेतकऱ्यांसाठी यंत्रे खरेदी करणे ही मोठी गुंतवणूक असते. शेतकऱ्यांना यासाठी स्वस्त कर्जाची आवश्यकता असते. भारतात बहुतेक कृषी कामांमध्ये यांत्रिकीकरणाचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे. भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रीय कृषी विस्तार अभियानाचा एक प्रमुख भाग म्हणून कृषी यांत्रिकी उपअभियान राबविण्यात येत आहे. या उपअभियानांतर्गत नवी कृषी यंत्रे आणि अवजारे यांचा प्रसार करण्यात येत असून भरपूर अनुदान देण्यात येत आहे. कृषी यांत्रिकीकरणामुळे मजुरांची कमतरता भरून काढली जाते. त्याचबरोबर त्याचा मुख्य उद्देश म्हणजे निर्विष्ठांचा कार्यक्षम वापर, वेळेवर शेती कामाची पूर्तता, उत्पादन खर्चात घट, शेतीतील कट कमी करणे आणि नैसर्गिक संसाधनाचे संवर्धन करणे हा आहे. बदलत्या हवामानानुसार जमिनीतील ओलाव्याचे संवर्धन, पावसाच्या पाण्याच्या नियोजनासाठी मशागतींची पद्धत, वेळेवर व योग्य मात्रेत खते-बियाणे पेरणी, आंतरमशागत, फवारणी, काढणी, मळणी, प्राथमिक प्रक्रिया, साठवण, वाहतूक आणि विक्री इत्यादी कामे करण्यासाठी अत्याधुनिक कृषी यंत्रांची गरज आज प्रकर्षाने जाणवत आहे. नवसंशोधित अवजारे आणि यंत्रे संशोधन केंद्रात उपलब्ध आहेत. यंत्रांची मागणी वाढत असली, तरी त्यानुसार पुरवठा होत नाही. भारतातील मागणी लक्षात घेऊन अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी मागील काही वर्षांमध्ये देशात त्याचे उत्पादन सुरू केले आहे. तसेच, परदेशातून मोठ्या प्रमाणात आयातही होत आहे. परदेशातून आलेली यंत्रे आपल्या देशात जशीच्या तशी उपलब्ध होत नाहीत. त्यासाठी स्थानिक गरजेनुसार बदल करणे आवश्यक आहे. विशेषतः ऊसतोडणी यंत्र, भातरोवणी यंत्र, पॉवर स्प्रेयर या आयात यंत्राचा बऱ्यापैकी वापर होताना दिसत आहे. कापूस वेचणी यंत्राचेही प्रयोग सुरू आहेत. ही सर्व प्रक्रिया मागील काही वर्षांमध्ये वेग घेताना दिसत आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)


## वेध

**विजय निचकवडे**

# कर्तृत्व कुणाचं; पाठ थोपटतोयं कोण?

हाडकुळा माणूस चांगला दिसत नाही. म्हणून थोडं मांस अंगावर आलं की, सगळे जण कौतूक करतात. पण तोच लठ्ठपणा अवाढव्य वाढला की, आलेली सूज माणसाला विद्रूप करते. शिक्षण क्षेत्राचेही असेच काहीसे झाले आहे. कधीकाळी मर्यादित पण गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था होत्या. आज व्याप वाढला, सांख्यिकी दृष्टीने आकडे वाढले; पण बाजारीकरण आले. ज्ञानदानाच्या पवित्र कार्याला अर्थार्जनाची काजळी चढली आणि पावित्र्य संपले. आज चित्र असे आहे, विद्यार्थी शाळेत येत नाहीत तरी उत्तीर्ण होतात आणि मग श्रम न करता यशाचे श्रेय घेण्यासाठी स्पर्धा लागते! अशावेळी विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय नेमके कुणाचे हा प्रश्न उरतोच!

नि:स्वार्थ भावाने व्यक्ती घडविण्याचा कारखाना म्हणून शिक्षण संस्थांकडे कधीकाळी पाहिले जात होते. शाळा म्हणजे विद्येचे मंदिर आणि या मंदिरातून मिळणारे ज्ञान म्हणजे आयुष्यभरासाठी शिदोरीरूपी प्रसाद होता. शाळांची संख्या कमी होती. पण ज्या होत्या, त्या खऱ्या अर्थाने विद्येचे मंदिर होत्या. त्यात व्यावहारिकता नव्हती, विद्यादान आणि विद्यार्जनाला पैशात मोजले जात नव्हते. होता तो केव ळ नि:स्वार्थ भाव! पण आज स्थिती काय आहे? शिक्षण संस्थांचा व्याप वाढला. अनेक प्रकारच्या शिक्षणाची दालने प्रचंड संख्येत उघडली गेली. पण त्यात आला तो व्यापार. शिक्षणाचे बाजारीकरण झाले. शाळेत प्रवेश घेण्यासाठी शाळा निधी किंवा अन्य गोंडस नावाखाली लाखो रुपयांची घेतली जाणारी मदत इथपासून ते शिक्षकांची भरती करताना जुळवून आणला जाणारा लक्ष्मीदर्शनाचा योग इथपर्यंत सर्व काही बदलले. शाळांचे बाजारीकरण झाले अन् शिक्षणाचा बाजार मांडला गेला. काहींना ते महत्त्व जपले असेलही, पण बाजारीकरणाच्या गर्दीत त्यांना तग धरताना बरेच काही सहनही करावे लागत असावे. शिक्षण संस्था चालकांची बदललेली मानसिकता पाहून नवे फॅड उदयास आले. खाजगी शिकवणी म्हणजे कोचिंगने शाळांची अवस्था बिकट केली. आज शून्य उपस्थितीत म्हणजे 'झिरो अटेंडन्स'वर शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. वर्षभर मुलं खाजगी शिकवण्यांमध्ये शिकतात. जणू काही तीच त्यांची शाळा असते. पण ज्यावेळी दहावी- बारावीचा निकाल लागतो, त्यावेळी ज्या शाळेत विद्यार्थी कधीच गेला नाही, ती शाळा आणि शिकवणी वर्ग दोघेही विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय स्वतःच्या पदरी पाडून घेत आपलीच पाठ आपण थोपटून घेतात. शाळेने यशाची परंपरा राखली असे सांगताना त्यांना हा विसर पडतो की, यशस्वी विद्यार्थी तर कधीच आपल्या शाळेत येऊन बसला नाही. शिकवण्यांचेही मोठमोठे फलक गावात झळकतात.




आता खरंच त्या विद्यार्थ्यांच्या यशाचे खरे हकदार कोण? ती शाळा, ज्यात विद्यार्थी तासभरही बसला नाही की त्या शिकवण्या? शाळेशी साटेलोटे करून विद्यार्थ्यांना आपल्याकडे ओढून घेणाऱ्या शिकवण्या विद्यार्थ्यांमागे शाळांना टक्केवारी देते अन् शाळाही शून्य उपस्थितीवर प्रवेशास तयार होते. ही शिक्षणाच्या मूळ हेतूशी प्रतारणा नव्हे का? कधीकाळी आपल्या विद्यार्थ्यांवर जिवापाड प्रेम करणाऱ्या संस्था विद्यार्थ्यांचे तोंडही वर्षभर पाहात नाही आणि त्याच्या यशात मात्र आपला वाटा गृहीत धरून आनंद साजरा करत असतील तर आपलीच पाठ आपण थोपटून घेण्याचा हा प्रकार बाजारीकरणामुळे संस्थांची झालेली केविलवाणी अवस्था सांगण्यास पुरेशी आहे. हा सर्व प्रकार उघड उघड होत आहे. शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी असलेल्या यंत्रणेला म्हणजे शिक्षण विभागाला याची जाण नाही, असे नाही. शाळांची संख्या वाढली, त्याच तोडीने खाजगी शिकवण्यासाठीसुद्धा वाढल्या. शाळांपेक्षा शिकवण्यांमध्ये गर्दी वाढत असल्याचेही त्यांच्या नजरेदेखत आहे. मग शून्य उपस्थितीवर शाळा चालविणे शिक्षण विभागाच्या नियमात आहे का? हे स्पष्ट व्हायलाच हवे. नाहीतर मग 'एकमेका साह्य करू' या धोरणावर हे सगळं सुरू आहे, हे आपसूकच सिद्ध होते. एकीकडे नवीन शैक्षणिक धोरण लागू झाले आहे. शिक्षण क्षेत्र अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत असताना विद्यार्थ्यांच्या यशात श्रेय कुणाचे हे कोडेच जर सुटणार नसेल तर घडणारे विद्यार्थी कसे घडतील, हा प्रश्नच आहे. शाळेत न जाता जाहिरातींच्या फलकावर फोटो लावून घेण्यात आनंद मानणारे विद्यार्थीच नव्हे, तर त्यांच्या पालकांसाठीही हे विचार करण्यासारखे आहे.

९७६३७१३४१७

## प्रासंगिक

# रोहिणी तडवळकर : सर्वव्यापी, सडेतोड, आक्रमक व अभ्यासू नेतृत्व

### तिन्ही आमदारांसह नव्या-जुन्या कार्यकर्त्यांची मोट बांधण्याची कसोटी

आपल्या गतिशील सामाजिक व राजकिय कार्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून गाजत असलेल्या व आगामी काळात गाजणाऱ्या सौ. रोहिणी रामचंद्र तडवळकर यांची सोलापूर भाजपच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे,त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन व त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा. सोलापूर भाजपच्या इतिहासात पहिल्यांदाच सौ.रोहिणी तडवळकर यांच्या रुपाने महिला अध्यक्ष झाल्या आहेत. त्या अध्यक्षपदाच्या स्पर्धेत नव्हत्या,त्यांनी दुसऱ्याचेच नाव त्या पदासाठी सुचविले होते आणि इतर काही मंडळींनीही जातीची समीकरणे पुढे करून आपले घोडे पुढे दामटले होते, त्या गर्दीत व संघर्षात भाजप पक्षश्रेष्ठींनी सौ.रोहिणी तडवळकर यांना संधी दिली आहे. सौ.रोहिणी तडवळकर ह्या मिळेल त्या पदाला न्याय संधीचे सोने करणाऱ्या कार्यकर्त्या-नेत्या आहेत,हे त्यांनी प्रत्येकवेळी दाखवून दिले आहे.

मुळात त्या विद्यार्थि परिषदेच्या मुशीत तावून सुलाखून निघालेल्या कार्यकर्त्या आहेत, त्याची बाजू व भूमिका भक्कम होती,आहे व राहणार आहे.त्यांच्या रुपाने एक वाघीण व रणरागिणीच भाजपच्या शहर अध्यक्ष पदावर रुजू झाली आहे. अंगभूत आक्रपणा व सडेतोडपणा, अभ्यासुवृत्ती हे त्यांचे खास वैशिष्टये आहेत.त्यांच्या सर्वस्पर्शी कामाची व संपर्काची सर्वांवरच भुरळ आहे.केवळ भाजप व संघ परिवारच नाही तर समाजाच्या सर्व घटकांशी त्याचबरोबर सर्व राजकीय पक्षातील नेते,कार्यकर्ते यांच्यासह त्यांच्या घरातील लोकांशी त्यांचा वैयक्तिक नाते,मैत्री व स्नेह आहे.त्यांच्या सर्वस्पर्शी संपर्काचा व नेतृत्वाचा त्यांना व भाजपाला नक्की फायदा होणार आहे. सद्या केंद्रात व राज्यात भाजपची सत्ता असल्याने सोलापूर महापालिकेतही सत्ता सहजच येईल,असे म्हणणे सोपे आहे पण त्यांच्यासमोर पक्षातील जबरदस्त आव्हान आहे ते म्हणजे त्यांना आ.विजयकुमार देशमुख आ.सुभाषबापू देशमुख व आ.देवेंद्रदादा कोठे यांच्यासह नव्या-जुन्या कार्यकर्त्यांची व्यवस्थित मोट बांधावी लागणार आहे तर दुसऱ्या बाजूला शहर वासियांचे विकासाचे व जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवावे लागणार आहेत.तसेच महापालिका निवडणुकीसाठी महायुती झाली तर त्यांना प्रामाणिक व निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी खूप कसरत करावी लागणार आहे,तेव्हा त्यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे.

विशेष म्हणजे गेल्या निवडणुकीत त्यांचे तिकिट कापण्यात आले होते मात्र आगामी काळात त्यांना सारा राग,अन्याय विसरून केवळ पक्षाच्या हितासाठी बेरजेचेच राजकारण करावे लागणार आहेत. सौ.रोहिणी तडवळकर यांचा थोडक्यात परिचय: शिक्षण:बीकॉम,डीबीएम व एम एसडब्ल्यू. एसलहानपणापासून राष्ट्रसेविका समिती तसेच महाविद्यालयीन काळात विद्यार्थी परिषदेच्या कामात अग्रभागी. महाविद्यालयीन आणि शैक्षणिक आंदोलनामध्ये मोठा सहभाग. १९९२ ला सोलापूर महापालिकेला शुक्रवार पेठ परिसरातून भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका म्हणून निवडून आल्या. १९९२ ते १९९७ त्यानंतर महापालिका परिवहन समिती सदस्य, २००२ ते २००७ पुन्हा तुळजापूर वेस, बाळीवेस परिसरातून नगरसेविका म्हणून निवडून आल्या. २०१२ ते २०१७ नगरसेविका आणि विरोधी पक्ष नेता,भारतीय जनता पार्टी महिला आघाडी शहर अध्यक्ष म्हणून देखील काम केलेले आहे. त्याचप्रमाणे शुक्रवार पेठ भागात राणी लक्ष्मीबाई महिला पतसंस्थेच्या माध्यमातून या भागात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक या क्षेत्रातही आपल्या कामाचा ठसा उमटवलेला आहे. याशिवाय पुण्यश्लोक अहिल्या अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर,राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य म्हणून कार्यरत आहेत. महाराष्ट्र स्तरावर अपंग कार्यक्षेत्रात त्यांच्या कामाची नोंद आहे. रोटरी मूकबधिर विद्यालय सोलापूर, येथून प्राचार्य म्हणून निवृत्त झालेल्या आहेत.

**- दशरथ वडतिले,**
माजी अध्यक्ष,सोलापूर श्रमिक पत्रकार संघ

## वाचक पत्रे

### पाकिस्तानचे अस्तित्व नष्ट केले पाहिजे

'निर्णायक धडा शिकवाच' हा अग्रलेख वाचला आणि पटलाही. पहलगाममध्ये पाकिस्तानी अतिरेक्यांनी केलेल्या नृशंस हत्यांनंतर भारतीय सैनिकांनी 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकिस्तानात असलेल्या नऊ अतिरेकी तळांना उद्ध्वस्त केले. तरीही पाकिस्तानात आणखी बरीच अतिरेकी प्रशिक्षण केंद्रे असल्याचे भारत सरकारने सांगितले आहे. या हल्ल्यांमुळे हादरलेल्या पाकिस्तानची परिस्थिती कठीण झाली आहे. भाराताविरोधात काहीही करण्याची क्षमता, हिंमत आणि तयारी नसल्यामुळे पाकिस्तान सरकार हतबल झाले आहे. या हल्ल्यानंतर काहीही केले नाही तर पाकिस्तानी नागरिकांच्या संतापाला तोंड दाखवणे अवघड होणार आहे. म्हणूनच पाकिस्तानी संरक्षणमंत्री भारताला माघार घेण्यास सांगत आहेत. भारताने तसे केले तर त्याबद्दल पाकिस्तानात खोट्या बातम्या पसरवून पाकिस्तानी सरकार आपली कातडी वाचवण्याचा प्रयत्न करेल. मात्र, आता भारतात काँग्रेसचे सरकार नसून नरेंद्र मोदींचे सरकार आहे, हे पाकिस्तानने लक्षात घेतले नाही. पहलगाममध्ये हल्ला करून पाकिस्तानने कुरापत काढली आहे. त्यावर भारताने सडेतोड उत्तर देऊन पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमधील अनेक अतिरेकी तळ उद्ध्वस्त करून शेकडो अतिरेक्यांना यमसदनी पाठवले आहे. याच संधीचा फायदा घेऊन भारताने पाकिस्तानचे अस्तित्व कायम नष्ट करावे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●

### विरोधाकरिता विरोध देशासाठी घातक

'निंदकाचे घर असावे शेजारी' अशी एक म्हण आहे. पण ते शेजारी त्रासदायक नसावे. निंदा केली तरी चालेल, पण त्यात सूडबुद्धी नसावी. भारतीय राजकारणाचे तसेच आहे. विरोधी पक्षाची त्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका आहे. सरकारचे धोरणात्मक निर्णय चुकत असतील तर जागृत विरोधी पक्ष या नात्याने सूचना करणे अपेक्षित आहे. पण तसे होताना दिसत नाही. केवळ विरोधाकरिता विरोध करण्याच्या भूमिकेतून परिस्थितीचा विपर्यास करताना दिसतात. २२ एप्रिल २०२५ ला पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर हल्ला केला. त्यात २६ पर्यटक मारले गेलेत. ही घटना दुर्दैवी आणि मनाला वेदना देणारी आहे. सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी मागणी देशाच्या कानाकोपऱ्यातून होऊ लागली. केंद्र सरकारने लगेच सर्व विरोधी पक्षांना चर्चेसाठी आमंत्रित केले. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी सरकारला संपूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. सरकारने विरोधी पक्षांच्या या सकारात्मक भूमिकेबद्दल आभार मानले.

७ मे पासून 'ऑपरेशन सिंदूर' सुरू झाले आणि केवळ ७२ तासांच्या आत पाकिस्तानला त्याची जागा दाखवून दिली. ११ मे ला तिन्ही सेना दलाच्या डीजीएमओंनी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत केलेल्या कारवाईची विस्तृत माहिती दिली. शस्त्रसंधीची माहिती दिली. या घटना सर्वांना माहीत असताना भारताच्या शस्त्रसंधीच्या निर्णयावर टीका करणे, हा निर्णय अमेरिकेच्या दबावात घेण्यात आला असन पंतप्रधान मोदींना परत एकदा आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यात येत आहे. ही विरोधकांची भूमिका योग्य वाटत नाही. भारताचे माजी अर्थमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांनी म्हटले आहे की, मोदींच्या धोरणामुळेच ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाले. अशीच सकारात्मक भूमिका अन्य विरोधी पक्षांचे नेते घेतील तर भारताचा सर्वांगीण विकास व्हायला वेळ लागणार नाही.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

●● ●●

### 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे'

समर्थांनी म्हटले आहे की, 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' याचा अर्थ आहे की, नुसत्या बोलण्याने किंवा दिखाऊपणाने काहीही उपयोग होत नाही. या पंक्तीस शोभून दिसणारे काही राजकीय नेते आपल्या राज्यात विशेषतः आजूबाजूला वावरताना सहज दिसतात. यापैकी एक उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत. कुठल्याही समयी, कोणत्याही प्रसंगी, कसल्याही विषयावर अगदी अधिकारवाणीने भरभरून बोलत राहणे हे त्यांचे वैशिष्ट्य. समोरच्या व्यक्तीची मन:स्थिती अथवा परिस्थिती याचे भान न ठेवता एकतर्फी बोलत राहत आपली प्रतिक्रिया देत राहाणे अशी हुशारी देवाने जणू त्यांनाच दिली आहे.

दुसरे म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे. यांच्या बाबतीत काहीच भरवसा नाही. कुठली भूमिका घेतील, केव्हा सोडतील याचा पत्ता लागत नाही. यांची राजकीय भूमिका कधीच पक्की नसते. त्यामुळे राजकारणात धरसोडवृत्तीसाठी ते प्रसिद्ध आहेत. आपल्या भाषणात जोरदार टिंगल करत आपल्या विरोधकांची टर उडविणे या पलीकडे पुढे त्यांची गाडी कधीच पुढे सरकत नाही. परिणाम निवडणूक निकालात जागा शून्य मिळतात. कोणीही इतरांपेक्षा आपल्या ज्ञानाची कक्षा किती विस्तृत आहे हे दाखवण्याचा अट्टहास बाळगतात आणि आपल्या बोलण्याच्या कलेला स्वतःचे बलस्थान समजू लागतात. या अतिरेकाचा परिणाम म्हणजे सर्वसामान्य लोक यांना आपल्या करमणुकीसाठी समजतात. आजच्या राज्याच्या राजकारणात या दोघांची अवस्था हीच झाली आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

●● ●●

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# बुध्द जयंतीनिमित्त शासकीय रूग्णालयात रूग्णांना खिरदान

## तक्षशीला बुध्द विहारात भगवान बुध्द जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

शहरातील शासकीय रुग्णालयात बुद्ध जयंती दिनानिमित्त मिलिंद उबाळे मित्र मंडळाच्या वतीने सलग १५ वर्षा पासून शासकीय रुग्णालयातील रुग्णांना खिर वाटप खिरदान करण्यात आले. तसेच तक्षशीला बुध्द विहारात भगवान बुध्द जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या मुर्तीला पुष्प अर्पण करून व बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले, यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हिंगोलीचे अधिष्ठाता डॉ.चक्रधर मुंगल, माजी नगराध्यक्ष जगजितराज खुराणा, माजी नगरसेवक अनिल नेनवानी, काँग्रेस पक्षाचे नेते सुरेशअप्पा सराफ, माजी नगरसेविका सौ.आशाताई उबाळे, सुमित चौधरी, सामाजिक कार्यकर्ते मिलिंद उबाळे, भिमशक्तीचे युवक जिल्हाध्यक्ष विशाल इंगोले, डॉ.दिपक मोरे, डॉ.मनिष बगडिया, आबेदअली जहांगीरदार, निरज देशमुख, कैलास डिडाळे, जुबेर मामु, विनीत उबाळे, बंडु नरवाडे, हारुण पठाण, बि.के.लांडगे, अशोक गायकवाड, विनोद पाईकराव, परिचारिका शेवडीकर, संतोष खंदारे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.विवेक मोरे यांनी तर आभार सामाजिक कार्यकर्ते मिलिंद उबाळे यांनी मानले.

जागतिक परिचारिका दिनानिमित्त सर्व परिचारिका यांना माजी नगरसेविका सौ.आशाताई उबाळे यांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. येथील सिद्धार्थ (मिलिंद) कॉलनी भागातील तक्षशिला बुद्ध विहारात बौद्ध पौर्णिमेनिमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या मार्गदर्शनाखाली बुद्ध जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विशाखा महिला मंडळाच्या वतीने खीर दान करण्यात आले. बुद्ध जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिद्धार्थ गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन लक्ष्मीबाई इंगोले ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे भीमराव कुरवडे, रामचंद्र वाढे, गौतम धुळे, आनंदराव पडघन, राहुल खिल्लारे, श्रीरंग वानखेडे, रुक्मिणीबाई पुंडगे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी त्रिशरण पंचशीलासह बुद्ध वंदना घेण्यात आली. याप्रसंगी बुद्ध जयंतीचे महत्त्व रामा वाकळे यांनी सांगितले. कार्यक्रमात डीजे व व्यसनमुक्त आंबेडकर जयंती साजरी करणाऱ्या मंडळाच्या अध्यक्षा उषा इंगोले यांचा भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकाऱ्यांनी सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनीत उबाळे यांनी केले तर आभार प्रकाश इंगोले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाऊराव पंडीत, सुभाष इंगोले, रंजीत धबडगे, भारतभूषण रणवीर, मिलिंद दिपके, लक्ष्मण पाईकराव, भारत मोरे, टी. एम. पाईकराव व विशाखा महिला मंडळाने परीश्रम घेतले.

# हिंगोली जिल्ह्याचा दहावीचा निकाल ९२.८२ टक्के



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या मार्च २०२५ च्या दहावीच्या परीक्षेचा जिल्ह्याचा निकाल ९२.८२ टक्के लागला असून मागील वर्षीपेक्षा किंचीत जास्त निकाल लागला आहे.

हिंगोली जिल्ह्यातील ५४ परिक्षा केंद्रावर दहावीच्या परीक्षा घेण्यात आल्या. तत्कालीन जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाधिकारी दिग्रसकर, संदीप सोनटक्के यांच्या पथकांनी कॉपीमुक्त अभियान राबवले. यासाठी जिल्हा स्तरावरून एक तर तालुकास्तरावर पाच भरारी पथके तसेच परीक्षा केंद्रावर बैठे पथकांची स्थापना करण्यात आली होती. परीक्षा भयमुक्त व कॉपीमुक्त पार पाडण्यासाठी सर्व पथकांनी भुमिका बजावली. तसेच संवेदनशील परीक्षा केंद्रावर चोख पोलिस बंदोबस्तही लावण्यात आला होता.

या परीक्षेचा ऑनलाईन निकाल दि १३ मे रोजी दुपारी एकनंतर जाहीर करण्यात आला. निकाल पाहण्यासाठी कॅफेसेंटरवर मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थीनींनी गर्दी केली होती.

यावर्षी दहावीच्या परीक्षेला जिल्ह्यातील १५ हजार ६१२ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १३ हजार ९०८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये विशेष प्राविण्यासह ३४६५ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ४५९३ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत ४३७१ विद्यार्थी तर १२७९ विद्यार्थी केवळ उत्तीर्ण झाले आहेत. तालुकानिहाय निकालात हिंगोली तालुक्यात ३८०४ पैकी ३३३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तालुक्याचा निकाल ८७.७७ टक्के लागला आहे. कळमनुरी तालुक्यात ३२५९ विद्यार्थ्यापैकी २८५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ८७.५७ टक्केवारी आली आहे. वसमत तालुक्यात ४३८६ पैकी ३९५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकालाची टक्केवारी ९०.१२ एवढी आहे. सेनगाव तालुक्यात २२७९ पैकी २०२४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकालाची टक्केवारी ८८.८१ आहे. औंढा नागनाथ तालुक्यात १८८४ पैकी १७३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकालाची टक्केवारी ९२.८२ एवढी आहे. निकाल पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती तसेच उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

# सर्व नियमांचे पालन करण्याची मांस विक्रेत्यांची ग्वाही



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

शहरातील हरण चौक व मच्छी मार्केट भागातील मांस विक्रेते नियमांचे पालन करीत नसल्यामुळे नगर परिषदेकडून कडक कारवाई करीत दुकानांना सील ठोकण्यात आले होते. कारवाईचा बडगा उगारताच मांस विक्रेत्यांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना सर्व नियमांचे पालन करणार असल्याचे लेखी निवेदन सादर केले आहे.

शहरातील हरण चौक, मच्छी मार्केत या भागाती उघड्यांवर मांस विक्री तसेच अतिक्रमणे आणि अस्वच्छता यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते तसेच याबाबत नगर पालिकेला तक्रारी मिळाल्यानंतर नगर पालिका प्रशासनाने या मांस विक्रेत्यांना वारंवार सूचना दिल्या परंतु हे दुकानदार ऐकण्यास तयार नव्हते सर्रास उघड्यावर मांस विक्री तसेच मांस कापणे आदी बाबी नियमबाह्य वर्तन करीत असल्याने नगर पालिकेच्या पथकाने पोलिस बंदोबस्तात या दुकानांना सील ठोकताच सदरील दुकानदारांनी मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांना निवेदन सादर करीत स्वच्छता राखण्याचे तसेच नियमांचे पालन करण्याची ग्वाही दिली आहे. निवेदनावर जवळपास १३ मांस विक्रेत्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

नगर पालिकेने या भागातील नियमबाह्य व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मांस विक्रेत्यांवर कारवाई करीत दुकानांना सील ठोकले.

उघड्यांवर मांस विक्री केल्यामुळे



**हिंगोली– येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात बुधवारी खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, आ. तान्हाजीराव मुटकुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर**

# बुध्द पोर्णिमानिमित्त वन विभागाकडून वन परिक्षेत्रातील प्राण्यांची गणना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

बुध्द पोर्णिमा निमित्त वन विभागाच्यावतीने दि १२ मे रोजी हिंगोली वन विभागातील वन क्षेत्रापासून ते वसमत वन क्षेत्रापर्यंत ठिकठिकाणी जंगल भागात वन्यप्राणी गणनेसाठी मचान तयार करण्यात आलेले आहेत. हिंगोली वन विभागात वनक्षेत्रात १३ मचान, औंढा वनक्षेत्रात १२ मचान, सेनगाव वन क्षेत्रात ९ मचान व वसमत वनक्षेत्रात ६ मचान असे एकूण ४० मचान तयार करण्यात आलेले आहेत.

सदर मचान तीन ते चार व्यक्ती एकावेळेस बसू शकतात. बुध्द पोर्णिमेच्या लख्ख प्रकाशात संपूर्ण रात्र जंगलातील थरार अनुभवण्याची संधी यंदाही निसर्ग अनुभवाच्या माध्यमातून उपलब्ध झाली. यादिवशी प्राण्यांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष गणना करण्यात आली. त्यासाठी ट्रॅप कॅमेऱ्याद्वारे गणना केल्या गेली. यावेळी बिबट, लांडगा, तडस, कोल्हा यासह निलगाय, काळवीट, चितळ, रानडुक्कर, साळींदर, ससा, मोर, रानमांजर आदी वन्यजीवांचे दर्शन वन्यप्रेमी तसेच वन विभागातील कर्मचाऱ्यांना घडले. सदरील गणना छत्रपती संभाजनगरचे वनसंरक्षक प्रमोद चंद लाकरा, विभागीय वन अधिकारी डॉ राजेंद्र नाळे, सहायक वनसंरक्षक सचिन माने यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागातील सर्व वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक, वन मजूर यांनी यशस्वीपणे पार पाडला.

# शेतीच्या वादातून दोन गटात तुंबळ हाणामारी वसमत तालुक्यातील धामणगाव येथील घटना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**



वसमत तालुक्यातील धामणगाव येथे शेतीच्या वादातून दोन गटात तुंबळ हाणामारी झाली असून यांमध्ये ११ जण जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी वसमतच्या उपजिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

धामनगाव शिवारातील गट क्रमांक १९५, गट क्रमांक १९६ व गट क्र. १९७ यामध्ये मारकोळे व पारखे यांच्यात मागील काही दिवसांपासून वाद सुरू आहे. सुमारे २० गुंठे जमिनीसाठी वाद होत असून त्यातून त्यांच्यात नेहमीच कुरबुरी होत होत्या. शनिवारी दि १० मे रोजी पुन्हा एकदा वादाला तोंड फुटल्यामुळे दोन्ही गटांनी कुरूंदा पोलिस ठाण्यात एकमेकांच्या विरोधात अर्ज दिला होता. त्यानंतर सपोनि रामदास निरदोडे, जमादार भगीरथ सवंडकर यांनी दोन्ही गटांना समजावून सांगितले तसेच प्रतिबंधात्मक कारवाई देखील करण्यात आली होती. परंतु मंगळवारी ता १३ सायंकाळच्या सुमारास पुन्हा एकदा वाद उफाळून आला यामध्ये दोन्ही बाजूंनी काठ्या, लोखंडी रॉडने हाणामारीला सुरूवात झाली. या हाणामारीमध्ये दुर्गाजी पारखे, रामेश्वर पारखे, लक्ष्मी पारखे, मीरा पारखे, रोहीदास पारखे हे जखमी झालेतर दुसऱ्या गटातील गणेश मारकोळे, राजेश मारकोळे, सुदामा मारकोळे, चंद्रकला वाघमारे हे जखमी झाले.

या घटनेची माहीती मिळताच कुरूंदा पोलिस ठाण्याचे सपानि रामदास निरदोडे, उपनिरीक्षक प्रवीण आगलावे, जमादार भगीरथ सवंडकर, बालाजी जोगदंड, रेखा मुंढे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना उपचारासाठी वसमतच्या उपजिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# भाजपच्या जिल्हाध्यक्षपदी गजानन घुगे यांच्या निवडीनंतर जल्लोष



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

भारतीय जनता पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी माजी आमदार गजाननराव घुगे यांची निवड झाल्याबद्दल व्यापारी असोसिएशनच्या वतीने नवा मोंढा येथे फटाके फोडून व पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला. यावेळी रमेश चंद्रसोनी, प्रकाश सोमानी, शिवाजी घुगे, मुरलीधर मुंदडा, बाबूशेठ बरडीया, शशिकांत दोडल, पवन मुंदडा, देवीकांत देशमुख, मुरली पांडे, प्रकाश सोमानी, प्रकाश बर्डिया, सुदर्शन कंदी, पवन मुंदडा, शंकर जोजार, कचरू आग्रवाल, संजय जैस्वाल, निशांत दोडल, राम घुगे, द्वारका आग्रवाल, नीलेश पांडे, अमित चांडक, मुरली मुंदडा, संतोष बक्कड, देविदास घुगे, गादेकर, विकास मुंदडा, बाळू घुगे, संजय लोंढे, किशन सोमाणी, बाळू सोनी, सुमित चांडक, विठ्ठल मेथेकर व सर्व व्यापारी उपस्थित होते.

# पतंजली योगपीठतर्फे तीन दिवशीय शिबीर

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, १४ मे**



पतंजली योगपिठ हरिद्वार येथील योगगुरु बाबा रामदेव यांचे परम शिष्य तथा मुख्य केंद्रीय प्रभारी स्वामी परमार्थ देवजी महाराज यांच्या उपस्थितीत दि १७ मे पासून होणाऱ्या तीन दिवसीय भव्य व निःशुल्क योग शिबिराचे आयोजन करण्यात आले असून विविध भागात पूर्वतयारी योग शिबिरे, पत्रके वाटप आदीचे नियोजन सुरू असल्याची माहीती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

दि १७ मे रोजी हॉटेल शांती या ठिकाणी पतंजली पदाधिकाऱ्यांचे राज्य संमेलन सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले असून या शिबिरास राज्यमंत्री मघनाताई साकोरे बोर्डीकर, खासदार नागेश पाटील आष्टीकर, हिंगोली जिल्ह्यातील सर्व विधानसभा सदस्य प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील अशी माहिती पतंजली योग समितीचे महाराष्ट्र प्रांत भारत स्वाभिमान प्रभारी दिनेशजी राठोड, राज्य युवा प्रभारी शंकर नागपुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी महाराष्ट्र प्रांत समितीचे सदस्य तथा जिल्हा संरक्षक कुंडलिकराव निर्मले, संजय चाफले, जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके, कोषाध्यक्ष उमेश तोष्णीवाल, पतंजली जिल्हा प्रभारी मनमथ गुमटे, सोशल मीडिया प्रभारी प्रणत अग्रवाल आदी उपस्थित होते.

हिंगोली येथील संत नामदेव पोलीस कवायत मैदानावर सकाळी पाच ते सात या वेळेत दोन हजार साधकांच्या उपस्थितीत या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरामध्ये योगिक जॉगिंग, सूर्यनमस्कार, योगासने, प्राणायाम, ध्यान आदीबाबत प्रात्यक्षिके करून घेतली जाणार आहेत. तसेच विविध रोगांवर घरेलू उपचार आदीचे मार्गदर्शन मिळणार आहे. नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महिला समितीच्या प्रांत सदस्य माधुरी शास्त्री, लीगल सेल एकनाथ बांगर जिल्हा प्रभारी, किसान प्रभारी ज्ञानदेव गुट्टे, युवा प्रभारी राजकुमार टिळे, सोशल मीडिया प्रभारी प्रणत अग्रवाल, महिला प्रभारी ज्योती शेळके, महामंत्री शितल तापडिया, पतंजलीचे सह प्रभारी बालासाहेब हरण, अशोक पवार, बाबुराव पारस्कर, गजानन खंदारे, पतंजली योगपिठाचे आजीव सदस्य संजय नाईक, तानाजी दासूद, डॉ. संतोष कल्याणकर तालुका पदाधिकारी व्हि.डी. देशमुख, अनंत जाधव, विलास काळे, बालाजी जाधव, जनक कदम, शितल बोरकर, मनीषा तोष्णीवाल, सुनिता घुगे, सीमा ढाले आदींनी केले आहे.

# सुखदेवानंद माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९६.२७ टक्के



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

जिजामाता बहुउद्देशीय सेवाभावी व शिक्षण संस्था हिंगोली संचलित दोन्ही विद्यालयाच्या निकालाने त्यांची निकालाची परंपरा कायम राखली असून सुखदेवानंद विद्यालयाचा निकाल ९६.२७% लागला असून त्यामध्ये विद्यालयातून सर्वप्रथम कु .जयस्वाल अनुश्री महेंद्रकुमार ९२.००%,द्वितीय कु.गिरी श्रद्धा शिवाजी व कु.गायकवाड संचिता संतोष या दोघींना प्रत्येकी ९१.४०% तर तृतीय कु.रणवीर सृष्टी आनंदा ९०.४०% निकालासह उत्तीर्ण झाले. तर देवकृपा माध्यमिक विद्यालय हत्ता (नाईक) चा निकाल ९०% लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपराव चव्हाण, सरचिटणीस .उत्तमराव जगताप सहसरचिटणीस ग्यानदेवराव जगताप, संचालक तथा प्रशासकीय अधिकारी प्रकाश निरगुडे, प्राचार्य वैद्य यांनी केला. यावेळी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# श्री क्षेत्र माहुरगड विकास आराखड्यासाठी ८२९ कोटी निधी मंजूर



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १४ मे-**

राज्य शासनाने राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधत त्यांच्या जन्मस्थळी चौंडी (जि. अहिल्यानगर) येथे ऐतिहासिक मंत्रिमंडळ बैठक आयोजित केली. या बैठकीत एकूण ५५०३.६९ कोटी रुपयांच्या मंदिर विकास कामांच्या आराखड्यांना मान्यता देण्यात आली असून यामध्ये नांदेड जिल्ह्यातील किनवट-माहूर विधानसभा क्षेत्रातील श्री क्षेत्र माहुरगड विकास आराखड्यासाठी ८२९ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. या ऐतिहासिक निर्णयानंतर माहूर विधानसभा क्षेत्राचे आमदार भिमराव केराम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विशेष सत्कार केला. देवस्थानच्या विकासासाठी सर्वाधिक निधी आणणारे भीमराव केराम हे एकमेव आमदार ठरले आहेत. यावेळी केंद्रीय जनजाती आयोगाचे वरिष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे यांचीही उपस्थिती होती.

श्री क्षेत्र माहुर हे हिंदू धर्मातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक पूर्ण शक्तीपीठ आहे. या पवित्र भूमीवर माता अणुसया, गुरुदेव दत्त व भगवान परशुरामांचे वास्तव्य लाभले आहे. त्यामुळे माहुर हे ठिकाण हिंदू धर्मीय श्रद्धाळूंना विशेष महत्त्वाचे मानले जाते. हजारो भाविक दरवर्षी येथे दर्शनासाठी येत असतात. या प्राचीन तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने केलेली ही घोषणा म्हणजे श्रद्धाळूंना व पर्यटकांना सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या विकास आराखड्यात रस्ते, पायाभूत सुविधा, मंदिर परिसराचे सुशोभीकरण, भक्तनिवास, पाण्याची व्यवस्था, स्वच्छता व सुरक्षितता यांचा समावेश आहे.

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या फक्त एक आदर्श शासिका तसेच त्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक पुनरुत्थानाच्या कार्यातही अग्रगण्य होत्या. त्यांच्या कार्यकाळात अनेक मंदिरे जी आक्रमकांनी नष्ट केली होती, त्यांचे त्यांनी जीर्णोद्धार केले. यामध्ये काशी विश्वनाथ मंदिर (वाराणसी), सोमनाथ, रामेश्वर, त्र्यंबकेश्वर, गंगा घाट (काशी) यांसारख्या अनेक महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांचा समावेश होता.

त्यांच्या या ऐतिहासिक कार्याला उजाळा देत आणि त्यांचे योगदान पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टिकोनातून चौंडी येथे मंदिर पुर्ननिर्माणाला सुरुवात करण्यात आली आहे. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त घेण्यात आलेला हा निर्णय म्हणजे त्यांचा गौरव करत त्यांच्या कार्याचे स्मरण करण्याचा आणि त्यांचा वारसा पुढे नेण्याचा एक पवित्र उपक्रम आहे. माहुरसारख्या पवित्र तीर्थक्षेत्राचा विकास हे केवळ अध्यात्मिक नाही तर पर्यटन, रोजगार आणि स्थानिक विकासाच्या दृष्टिकोनातूनही अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. असे आ. केराम यांनी माध्यमासी बोलताना सांगितले आहे.

# पावसाळ्यापुर्वी नाली सफाई कामांना सुरुवात

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १४ मे-**

मुदखेड नगरपरिषदेने पावसाळ्यापूर्वी आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा प्रश्नांना प्राधान्य द्यायला सुरुवात केली आहे. मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेकडून पावसाळ्यापूर्वी नाली सफाई कामांना सुरुवात केली आहे.पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असते जर नाल्या साफ असतील तर पाण्याचा योग्य निचरा होत असतो. त्यामुळे शहरामधील नाल्या तुंबलेल्या असतील किंवा झाडे झुडपे व गवतामुळे नाल्यातुन पाणी सुरळीत जात नाही अशा ठिकाणी नाल्यांची साफसफाई नगरपरिषदेचे कामगार काम करित आहेत.



पावसाळ्यात नागरीकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये तसेच नागरीकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. याची काळजी नगर परिषदे कडून घेतली जात आहे. घान कचऱ्यामुळे किंवा कोणत्याही कारणामुळे पावसाळ्यात नाले भरणार नाहीत. तसेच नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी नगरपरिषद दक्षता घेत आहे. ही स्वच्छता मोहीम मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता विभागाचे अभियंता सुशील खिल्लारे यांच्या अधिपत्याखाली सुनील माळी व नगरपरिषदेचे कर्मचारी काम करित आहेत.

## कुंडलवाडी येथे महसूल व वन विभागाच्या वतीने राजस्व अभियान समाधान शिबिर

**तभा वृतसेवा**
**कुंडलवाडी, दि. १४ मे-**

नागरिकाना प्रमाणपत्र ,दाखले लवकरात लवकर देण्यात येतील व नागरिकाचे काही महसूल विभागाशी काही समस्या असतील तर नागरिकांनी महसूल विभागाशी संपर्क साधावा व लवकरात लवकर समस्या सोडवण्याचा महसूल प्रशासना कडून प्रयत्न केला जाईल असे कुंडलवाडी येथे महसूल व वन विभागाच्या वतीने शिवाजी महाराज राजस्व अभियान समाधान शिबिर अंतर्गत कार्यक्रमात बिलोलीचे तहसीलदार बोलताना म्हणाले.

या कार्यक्रमास बिलोलीचे उपजिल्हाधिकारी क्रांती डोंबे, तहसीलदार गजानन शिंदे , कुंडलवाडी मंडल अधिकारी अंबेराय कुंडलवाडीचे तलाठी पवन ठकरोड , पिपळगावचे तलाठी रायबोले मॅडम, अन्नमवार मॅडम,माचनुरचे तलाठी कांबळे महसुल कर्मचारी धर्मकरे, सायलू बंठावार, अदि उपस्थीत होते.

या कार्यक्रमात नागरीकांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास कुंडलवाडी व परिसरातील शेतकरी नागरीक पत्रकार उपस्थीत होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भोरे यांनी केले.

# विष्णुपूरी जि. प. हायस्कूलचा निकाल ९७.०२ टक्के



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १४ मे-**

जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरीचा येथील शाळेचा दहावीशालान्त प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल९७.०२ टक्के लागला असून काळे दिपाली संजय हिने ९५.४०टक्के गुण घेऊन शाळेतून पहिली तर विशेष प्राविण्य मध्ये ३३ तर प्रथम श्रेणीमध्ये ६७ विद्यार्थी आले आहेत.

विष्णुपूरी येथील जिल्हा परिषद हायस्कूलचा निकाल चालु २०२५ या शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या या शाळेतील अनेक विद्यार्थी विविध स्पर्धापरीक्षा मध्ये चमकले आहेत . अनेक विद्यार्थी घडविणाऱ्या जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपूरी या शाळेचे १६८ विद्यार्थी परीक्षेस बसले होते यात घोषित झालेल्या निकालात १६८ पैकी १६३ विद्यार्थी पास झाले सहा विद्यार्थी ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन तर विशेष प्राविण्यामध्ये ३३ प्रथम श्रेणीमध्ये ६७ तर द्वितीय श्रेणीमध्ये ४७ तृतीय श्रेणी १६ विद्यार्थी आले आहेत .शाळेतून प्रथम येण्याचा मान काळे दिपाली संजय ९५.४० दुसरा पांचाळ श्रद्धा नागोराव ९४.२०टक्के तृतीय रिंगे मयुरी संतोष ९२.६० टक्के आर्यन डाके ९१.६० टक्के सोनटक्के सृष्टी शरद ९२.२० टक्के केंद्रे आश्लेषा दन्ता ९० या विद्यार्थ्यांनी मान मिळविला नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार मोहनराव हंबर्डे ,शालेय समिती अध्यक्ष राजु उर्फ विलासराव हंबर्डे , सरपंच श्रीमती . संध्याताई विलासराव हंबर्डे, उपसरपंच श्रीमती अर्चनाताई विश्वनाथराव हंबर्डे , शालेय समिती उपाध्यक्षा श्रीमती विजयाताई साहेबराव हंबर्डे मुख्याध्यापिका श्रीमती उज्वला कृष्णाजीराव जाधव पर्यवेक्षक शिवाजी वेदपाठकसर खदीर एम . ए सर बिरादार कृष्णा सर काकडे मारोती नाईनवाड पंचफुला ईदलगावे चंद्रकला वळगे आनंद व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी सर्व शालेय समिती सदस्य गावकरी यांनी गुणवंत व पास झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे .

## राजे छत्रपती संभाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि. १४ मे-**

हिंदू धर्मरक्षक, शुरवीर,छावा, महान योद्धा यासह अनेक विशेषणांनी संबोधल्या जाणाऱ्या संभाजी राजेंची ३६८ वी जयंती तालुक्यात विविध ठिकाणी सर्वत्र आनंदात साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने नगरपंचायत, माहूर येथे स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती बुधवारी उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम छ.संभाजी राजेंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन पुष्पहार अर्पण करून राजेंना विनम्र अभिवादन करण्यात आले. प्रौढ प्रताप पुरंदर,महापराक्रमी रणधुरंदर, क्षत्रियकुलावतंस,सिंहासनाधीश्वर महाराजाधिराज, महाराज, श्रीमंत श्री छत्रपती संभाजी महाराज की जय! असे छ. संभाजी राजेंचे गुणगौरवगान करणाऱ्या संदेशांच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी तमाम माहूर शहरवासीयांना दिल्या.

यावेळी ओ.एस.गजलवाड,एस. एस.पाटील, देवीदास सिडाम, जोंधळे, सुरेंद्र पांडे, खडसे यांच्यासह महिला कर्मचारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### राजर्षी शाहू विद्यालयाची यशाची उज्वल परंपरा कायम

**नांदेड** -नांदेड शहरातील राजर्षी शाहू विद्यालय, वसंतनगर, नांदेड माध्यमिक शालान्त परीक्षेत घवघवीत यश संपादित करून नांदेड शहरातील शाहू पॅटर्न कायम राखला आहे. शाळेच्या निकालाची वैशिष्ट्ये म्हणजे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील शाळेचा निकाल ९९.२७ टक्के लागला आहे. ९० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण घेऊन एकूण ३५ विद्यार्थ्यांनी बाजी मारली. या परीक्षेत क्षितीज बालाजी कदम याने ९९.६० टक्के गुण मिळवून शाळेतून सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला, पंकज मारोती कान्हे ९७.६० टक्के गुण मिळवून सर्वद्वितीय आला आहे, तर मथुरेश नितीन राणे याने ९७.२० टक्के गुण घेऊन सर्वतृतीय ठरला आहे. शाळेतील ३७५ प्रविष्ट विद्यार्थ्यांपैकी २७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्राविण्यासह १२६ विद्यार्थी, प्रथमश्रेणीत ९६ तर द्वितीयश्रेणीत ३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे मराठवाडा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव कदम, सचिव चंद्रशेखर सोनवणे, उपाध्यक्ष गोविंदराव थेटे, कोषाध्यक्ष नरसिंगराव पावडे व संस्थेचे सर्व सदस्य शाळेचे मुख्याध्यापक बालाजी हंगरगे, उपमुख्याध्यापिका एन.एस. खुळे, पर्यवेक्षक अमोल भंगाळे, शालेय समितीचे सदस्य प्रा. सुभाष तिवडे, राजर्षी शाहू विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व पालकांचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### के.रामलू पब्लिक स्कूलचा दहावीचा शंभर टक्के निकाल



**कुंडलवाडी** -दरवर्षीप्रमाणे याही वर्षी के.रामलू पब्लिक स्कूलचा दहावीचा निकाल १००% लागला आहे . संकेत साईनाथ अष्टमवार हा ९७.२०% गुण घेऊन इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून तालुक्यात प्रथम आला आहे तर दिडशेरे तुळशीराम चक्रधर हा ९६.००%गुण घेऊन केंद्रातून द्वितीय तसेच शेख आयन अलीम हा ९४.६०%गुण घेऊन केंद्रातून तृतीय आला आहे . दहावीच्या बोर्ड परीक्षेला शाळेतील एकूण ५९ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ९०% पेक्षा जास्त गुण घेणारे १६ विद्यार्थी , ८५% पेक्षा जास्त गुण घेणारे १९ विद्यार्थी , ८० टक्के पेक्षा जास्त गुण घेणारे १८ विद्यार्थी , तर प्रथम श्रेणीत ०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत . शाळेने यशाची परंपरा कायम राखून ठेवल्याने पालका कडून अभिनंदन होत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष साईरेड्डी ठक्कूरवार सचिव यशवंत संगमवार संचालिका रमा ठक्कूरवार आणि मुख्याध्यापक व सर्व शिक्षक , शिक्षिका ,कर्मचारी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले .

### अनिकेत धुतमल,आयुष महाबळे,बूध्दभूषन यानभुरे यांचे इयत्ता दाहावित घवघवीत यश

**लोहा** -नगर परिषद कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी हारी धुतमल यांचा मुलगा अनिकेत धुतमल , पत्रकार रत्नाकर महाबळे यांचे चिरंजीव आशिष महाबळे,भारतीय बोध्द महासभेचे धोंडीबा यानभुरे यांचे चिरंजीव बुध्दभुषण यांनभुरे या मुलाने जिद्द, मेहनत, परिश्रम व अभ्यासाच्या बळावर माध्यमिक दहावी शालांत परीक्षेत उत्तम टक्केवारी घेऊन चांगले गुण संपादन करत घवघवीत यश मिळविले. हरी धुतमल नगर परिषद कार्यालयात कर्मचारी आहे. व रत्नाकर महाबळे पत्रकार आहे आणी धोंडीबा यानभुरे भारतीय बौद्ध महासभाचे काम करतात. इतराची मुले चांगले शिक्षण मिळावे म्हणून शहराच्या ठिकाणी ठेऊन खाजगी शिकवणी लावतात या पालकांनी मुलांच्या कोणत्याही सुविधा पुरवल्या नाहीत. अनिकेत धुतमल पाहुण्याकडे राहून त्याने जिद्द, कठोर परिश्रम केले.आशिष महाबळे घरीच अभ्यास केला तर बुध्दभुषण यानभुरेनी कोणताही खाजगी शिकवणी लावली नाही पण इयत्ता दाहावित चांगले गुण घेऊन उतिर्ण झाले त्याच्या यशाबद्दल डॉ. मिलिंद धनसडे, नगरसेवक पंचशील कांबळे, पत्रकार डी. एन. कांबळे, रिपाईचे सुरेश महाबळे, संतोष तोंडारे, बाळासाहेब दाढेल, भीमकीर्तिराज कलंबरकर, राहुल ढवळे, दिलीप धूतमल, सदानंद ढवळे आदींनी कौतुक केले.

# जगाला यूद्धाची नव्हे तर बूद्धाच्या विचाराची गरज: एल. ए. हिरे

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १४ मे-**

हिंसाचाराने मानवाचे कल्याण होत नाही जगाला युद्धाची नव्हे तर बुद्धाच्या विचाराची गरज आहे भगवान बुद्ध,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वारसदार म्हणणाऱ्या बौध्द बांधवानी त्यांच्या विचाराने चालतो का!याच आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली असल्याचे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते एल.ए.हिरे यांनी केले.

सोमवार दि.१२ मे२ ५ रोजी मौजे सावरगावमेट ता.भोकर येथे उभारण्यात आलेल्या नवीन नालंदा बुद्ध विहाराचा लोकार्पण सोहळा व बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना भन्ते राजरत्न यांचे हस्ते करण्यात आले सकाळी बौध्द महासभेचे तालुका अध्यक्ष सुरेश जोंधळे यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण झाल्यानंतर वंदना व पूजापाठ घेण्यात आली सायंकाळच्या सत्रात ज्येष्ठ कार्यकर्ते, पत्रकार एल.ए.हिरे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा घेण्यात आली.यावेळी अध्यक्षीय समारोप करताना भिगवान बुद्धांनी शाक्य कोली यांच्यात पाण्यासाठी होणाऱ्या युद्धाला विरोध करून वनवासात जाने पसंत केले मानव कल्याणासाठी बौद्ध धम्माची स्थापना केली.चक्रवर्ती राजा अशोक सम्राटांनी समतेचा बौद्ध धर्म स्वीकारून८४ हजार बुद्ध विहारे बांधली छत्रपती संभाजी राजे यांनी चौदाव्या वर्षी बुद्धभूषण ग्रंथ लिहिला छ.शिवाजी राजे हे पण बुद्ध विचाराचेच होते असे सांगून हिरे म्हणाले संत थोर पुरुषाच्या विचाराने समाजाची प्रगती होते सावरगाव मेटच्या हिंदू लोकांनी बुद्ध विहार लोकार्पण सोहळ्याला मदत करून भोजनदान दिले गावात एकोपा निर्माण केल्या बद्दल हिरे यांनी ग्रामस्थाचे मनभरून कौतुक केले.

यावेळी जि.प.चे माजी सभापती बाळासाहेब पाटील रावणगावकर यावेळी तेलंगणाचे आंबेडकरी नेते गिरीधारी जंगमे,गणपत जाधव पाळजकर,पप्पू पाटील कोंडेकर, नागनाथ घिसेवाड,यांनीही विचार मांडले यावेळी आनंद पाटील ढवळे,गणेश पाटील, प्रशराम पाटील डौरकर, दिलीप जाधव,जगदीश पाटील,पांडुरंग उमरे, बळीराम कदम, ज्ञानेश्वर माऊली, श्रीनिवास शिरमोड,शेटी बंडोड,संदीप गौड,डॉ साईनाथ वाघमारे,तोशिफ इनामदार,बी. एस.सरोदे,विक्रम क्षिरसागर आदींची उपस्थिती होती कार्यक्रमाचे शानदार सूत्रसंचालन प्रा.रवींद्र जाधव यांनी केले तर आभार संजय सोनकांबळे यांनी मानले.

## सैनिकी विद्यालायचा १०० टक्के तर शिवाजी हायस्कूलचा ९५ टक्के निकाल

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. १४ मे-**

येथील राजर्षी श्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालयाने मागील २४ वर्षांची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली असून प्रथमेश कामशेट्टे या विद्यार्थ्याने १०० टक्के गुण मिळवत नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. श्री छत्रपती शिवाजी हायस्कूलमधील प्राची कोदळे हिने ९८.८ गुण मिळवत विद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान मिळविला असून माध्यमिक शालांत परीक्षेत येथे मुलींनी बाजी मारली आहे.



सैनिकी विद्यालयाने गेल्या २४ वर्षापासून १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली. एकूण ५० पैकी ४३ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत तर ७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले, यामध्ये प्रथमेश नरसिंग कामशेट्टे याने १०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला असून विद्यालयाच्या इतिहासात एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. कृष्णकांत साईनाथ बोडके ९६.८० द्वितीय क्रमांक व अनंत अविनाश पंदिलवार याने ९६.२० गुण मिळवीत तृतीय क्रमांक मिळविला आहे.

शिवाजी हायस्कूल मधील प्राची कोदळे हिने ९८.८ गुण मिळवत विद्यालयात प्रथम तर सुप्रिया परसुरे ९६.८ गुणांसह द्वितीय व गायत्री पांचाळ हिने ९५.८ गुणांसह तृतीय स्थान मिळवले. येथे एकूण ३०३ विद्यार्थ्यांपैकी २८९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ९५.३७ टक्के निकाल लागला आहे.

विद्यार्थ्यांच्या यशामागे कठोर परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध अभ्यासपद्धतीचा मोठा वाटा असल्याचे दोन्ही विद्यालयाने नमूद केले आहे. संस्थेचे चेअरमन प्रमोद प्रमोद देशमुख, सचिव डॉ. जयंत जकाते प्राचार्य गिरीश अलूरकर, संभाजी गायकवाड आदींनी अभिनंदन केले.

## पटणे विद्यालयाचा ९७ टक्के निकाल

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. १४ मे-**

मंगळवार दि.१३ मे रोजी दुपारी शिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावर दहावी बोर्ड सन २०२५ परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. त्यात बिलोली तालुक्यातील आदमपूर येथील महाळप्पा पटणे विद्यालयाचा निकाल ९७.९० टक्के निकाल लागला असून त्यामध्ये ३६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर १३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. शाळेच्या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांतून कु.कांचन सुरेश हांद्रे ९१.८०% गुण घेत शाळेतून सर्वप्रथम आली तर संयुक्त द्वितीय क्रमांकावर दोन विद्यार्थी त्यापैकी एक कु.वैष्णवी शंकर चिगळे हिने ९०.६०% तर रोहित रवी भुरे याने पण ९०.६०% व तृतीय क्र. बामणे ईश्वर आनंदा ९०.२०% गुण प्राप्त करत यश मिळविले आहे.

## छ. शिवाजी महाराज यांच्या डिजिटल तैलचित्राची तोडफोड



**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १४ मे-**

इस्लापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे यांच्या डिजिटल बोर्डाच्या तैल चित्राची तोडफोड केल्याची घटना १४ मे रोजी सकाळी उघडकीस आली आहे.

सदरील घटना कळता काही वेळातच सर्वत्र पसरल्याने इस्लापूर शहरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले संतप्त झालेल्या नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैल चित्राची तोडफोड करणाऱ्याला तात्काळ अटक करा अशी मागणी करत येथील नागरिकांनी काही काळासाठी मार्केट बंद ठेवळी

या घटनेची माहिती भाजपाचे किनवट दक्षिणचे तालुका अध्यक्ष सूर्यकांत अरंडकर यांना कळताच यांनी इस्लापूर येथे भेट दिली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैल चित्राची तोडफोड करून राजे यांना अपमानित करणारा व समाजा समाजामध्ये द्वेष पसरवणाऱ्या समाज कंटकाचा शोध घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करा त्याला अटक करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन गावकरी यांच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक डाके व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक कांबळे यांना देऊन सर्व समाज बांधवांनी मागणी केलीय.. इस्लापूर पोलिसांनी वेळ प्रसंग सावधानता बाळगत सीसीटीव्ही फुटेज चेक करत आरोपी निष्पन्न झाल्याचे सांगत आरोपी संचिन अशोक नारेवाड वय २४वर्ष रा. इस्लापुर याच्या विरूद्ध गुर नंबर ४९/२५ कलम २९८बी. एन.एस. प्रमाने गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीस अटक केली. अटक करताच व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने सुरू केली आहेत.

यावेळी भाजपाचे किनवट दक्षिण तालुका अध्यक्ष सूर्यकांत आरडकर. किनवट पंचायत समितीचे उपसभापती कपिल करेवाड, किनवट पंचायत समिती सदस्य माधव डोकळे,माजी सरपंच श्रीरंग पवार, सूर्यकांत बोधनकर, देविदास पळसपुरे,भाजपाचे काशिनाथ शिंदे राजू घोगरे पाटील,भुजंगराव पाटील, स्वप्निल गरडे, रवी कसबे, बालाजी दुरपडे पाटील, राजीव गडपाळे, रमेश बोडेवार, दत्तात्रेय पलीकोंडावार, खंडू गिरासे, डॉ.मोहन गोणेवार, अरविंद राणे, दिगांबर आडे, निर्गुण कदम, बालाजी पळसपुरे, लतीफ शेख, विकास माहुरकर, बालाजी जाधव, गौरव कदम, श्रीकांत जाधव, आडेलू पोहेकर, साहेबराव पळसपुरे अमर गिरी गणेश भोयर, साईनाथ पळसपुरे, साईनाथ सोनेवाड, विशाल रेखावार, गजानन तुप्तेवार, सुदर्शन पाटील,ओम पाटील, मारोती शेळके परमेश्वर पेशवे,प्रमोद जाधव,इश्वर जाधव, गणेश जयस्वाल उपस्थित होते.

सदर घटने संमधी काशिनाथ शिंदे यांनी इस्लापुर पोलीस स्टेशनला घडलेल्या घटने समंधी तक्रार दिल्याने इस्लापुर पोलीसांनी आरोपीस तात्काळ अटक केली आहे दरम्यान ठाण्याचे सपोनि उमेश भोसले यांनी शांतता राखण्याचे आव्हान केले.

# मान्सूनपूर्व नाले साफसफाई मोहीम राबविणार : मुख्याधिकारी गौरव वांडेकर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १४ मे-**

येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी हदगाव शहरातील सखल भागात पाणी साचून होणाऱ्या रोगराई पासून नागरिकांचे आरोग्याचे संरक्षण व्हावे याकरिता हदगाव शहरातील मुख्य नाले तथा अंतर्गत नाले यांचे मान्सूनपूर्व शक्यतो जेसीबीच्या साह्याने अथवा सफाई कामगार यांच्याकडून सफाईचे काम युद्धपातळीवर लवकरच राबविणार असून नागरिकांनी ही नाल्यांमध्ये कचरा टाकू नये त्यामुळे पावसाळ्यात नाल्या तुंबण्याची शक्यता असते व रोगराई पसरण्याची भीती सुद्धा असते कचरा आपल्या परिसरात दररोज येणाऱ्या घंटागाडीतच टाकण्याचे आव्हान मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांनी केले आहे.



हदगाव शहरातील सखल भागात नेहमीच पावसाळ्यात पाणी साचून नागरिकांचे आरोग्याचे भीषण संकट उद्भवत होते. शहरातील हातोटी नाला वगळता इतरत्र पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने सखल भागातील नाल्या तुंबल्याने त्याचे पाणी सर्रास रस्त्यावरती किंवा वस्तीकडे पसरत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असून ही गंभीर बाब मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी यात लक्ष घालत त्वरित ज्या ठिकाणी शक्य आहे तिथे जेसीबीने अथवा सफाई कामगार यांच्या माध्यमातून नाले सफाई पावसाळ्यापूर्वीच पूर्ण करण्याचे नियोजन केले असून त्यास लवकरच सुरुवात देखील होणार असल्याचे कळविण्यात आले तरी नागरिकांनी कचरा त्यांच्या परिसरात दररोज येणाऱ्या घंटागाडीतच टाकावे व पावसाळ्यात आपले आरोग्य निरोगी राहावे याकरिता नागरिकांनी सतर्कता बाळगावी असे आव्हान देखील मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांनी शेवटी केले.

# शेतकऱ्यांनी केवळ डिएपी वरच अवलंबून न राहता पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१४ मे**

महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे. राज्यामध्ये सद्या पेरणीला सुरुवात झाली असून डिएपी खताची शेकऱ्यांकडून जास्त मागणी असून डिएपी (Di-ammonium Phosphate) खता मध्ये १८ ट्क्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत यासाठी शेतक–यांनी डिएपी खते वापरावीत.

डिएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डी ए पी खतानंतर एस एस पी (Single Super Phosphate) या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद–१६ ट्क्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे

तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी

गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे.

एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके – १०:२६:२६, एनपीके – २०:२०:०:१३, एनपीके – १२:३२:१६ व एनपीके – १५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो. त्याच बरोबर टिएसपी (Tripple Super Phosphate) या खता मध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असुन डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टिएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखिल डिएपी खतास उत्तम पर्याय आहे. चालू खरिप हंगामामध्ये शेतक–यांनी केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजार मध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

# बीड शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ मे**

शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबवण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि. १३) रोजी नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली.

या बैठकीत शहरातील नालेसफाई, रस्त्यांची स्वच्छता, आणि पाण्याचा निचरा यासंबंधी सविस्तर चर्चा झाली. आ. क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांना मान्सूनापूर्वी सर्व नाल्यांची साफसफाई पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्याचे निर्देश दिले. बीडकरांना पावसाळ्यातील समस्यांना सामोरे जावे लागू नये, यासाठी नियोजनबद्ध काम करणे गरजेचे आहे,असे आ.संदीप क्षीरसागरांनी यावेळी सांगितले. येत्या १० ते १२ दिवसांमध्ये शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम पूर्ण करण्याचे नियोजन करून स्वच्छता मोहीम युध्दपातळीवर राबविण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी नगरपालिकेला दिले आहेत.

# लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालय खापर पांगरी विद्यालयाचा १००% निकाल

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१४ मे**

६२ विद्यार्थी विशेष प्राविण्य ८ विद्यार्थी प्रथम श्रेणी तर ०१ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत . १९ विद्यार्थी ९० % पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले.गुणानुक्रमे विद्यार्थी १.कथले कार्तिक युवराज ९६.४०% २ .कथले सौरभ गणेश ९६ % ३.शेख सरीना मजित ९६ % ४ .गायके पायल विष्णु ९४.२० % ५ . कथले ऋतुजा विठ्ठल ९४ .२०% ६ . चव्हाण सानिका गोरखनाथ ९३.४०% ७ . शिंदे ऋतुजा शिध्देश्वर ९३.२० % ८ आगाम साक्षी ज्ञानेश्वर ९३ .२०% ९ . गवते संध्या भाऊसाहेब ९३.२०% १०. बजगुडे साक्षी वैजिनाथ ९२ .४०% ११. चौरे चैतन्य कल्याण ९२.२०% १२. शेळके तेजस्विनी दादासाहेब ९२.८०% १३ . पवार चरण रायचंद ९२.४०% १४ . हाकाळे ओंकार सुग्रीव ९१% १५ . गायके संग्राम रामप्रसाद ९०.८०% १६ . भोसले प्रतिक्षा संजय ९०.८०% १७ . चव्हाण ऋतुजा राहूल ९०.८०% १८ . घोलप सिद्धि नारायण ९० .६०% १९ . आगाम पायल अच्यूत ९०.६० %

या यशाबद्दल संस्था अध्यक्ष श्री राजेंद्रजी आगवान, उपाध्यक्ष श्री पंजाबराव मस्के ,सचिव सतीश पत्की, सहसचिव विनय आगवान, शालेय समिती अध्यक्ष श्री संजय पत्की, मुअ घोडके डी डी, शिक्षक वशिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामस्त यांनी उत्तीर्ण विद्याथर्यां चे अभिनंदन करून व पुढील वाटचालिस शुभेच्छा दिल्या.

## भागुजीराव ढेकळे विद्यालयाने शालांत परीक्षेत यशाची परंपरा राखली

**शाळेचा शेकडा निकाल ९८.१९%**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ मे**

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९८.१९% निकाल लागला असून या शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेला शाळेतून १६३ पैकी ११६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

# नरेगाच्या बोगस आणि निकृष्ट कामांचा आ.क्षीरसागरांकडून 'पोस्टमार्टम'

**भ्रष्टाचारात समावेश असलेल्या प्रत्येकावर कारवाईसाठी पाठपुरावा करणार– आ.संदीप क्षीरसागर**



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ मे**

बीड विधानसभा मतदारसंघात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच नरेगाच्या अंतर्गत अनेक निकृष्ट दर्जाची आणि बोगस कामे झाली आहेत. शासकीय अधिकारी यांच्याशी संगनमत करून अनेकांनी यामध्ये मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. या सर्व प्रकरणांचे आता आ.संदीप क्षीरसागर यांनी पोस्टमार्टम करायला सुरुवात केली आहे, म्हणजेच झालेल्या कामांची स्वतः आ.संदीप क्षीरसागर जाऊन पाहणी करत आहेत. नरेगा अंतर्गत झालेली कामे अत्यंत निकृष्ट आणि काही ठिकाणी तर चक्क बोगस असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

बीड विधानसभा मतदारसंघातील बीड आणि शिरूर कासार तालुक्यात अनेक ठिकाणी बोगस कामे झाल्याचा तक्रारी होत्या. अनेक कामे हि अतिशय निकृष्ट झालेली आहेत. काही विशिष्ट लोक, ठेकेदार आणि शासकीय अधिकारी यांनी संगनमत करून भ्रष्टाचारी पॅटर्न राबवला आहे. या गंभीर विषयाची दखल घेत आ.संदीप क्षीरसागर यांनी झालेल्या बोगस आणि निकृष्ट कामांची पाहणी आणि चौकशी सुरु केली आहे. बुधवारी (दि.१४) रोजी बीड तालुक्यातील नाळवंडी आणि काळेगाव हवेली या गावांमध्ये आ.संदीप क्षीरसागर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत जाऊन झालेल्या निकृष्ट आणि बोगस कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. आता बीड मतदार संघात झालेल्या नरेगाच्या प्रत्येक बोगस आणि निकृष्ट कामाची मी स्वतः जाऊन प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. शासनाच्या निधीची पद्धतशीर विल्हेवाट लावण्याचे काम करणाऱ्या प्रत्येकावर कारवाई करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले आहे.

# ग्राम विकास विभागाचे उप आयुक्त झाले अपर आयुक्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ मे**

महाराष्ट्र विकास सेवा गट–अ संवर्गातील उप आयुक्त (आस्थापना) व उप आयुक्त (विकास) यांच्या पदनामामध्ये बदल करणे बाबत महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रीत अधिकारी संघटनेच्या वतीने शासनास वारंवार विनंती करण्यात येत होती. सदर मागणी ही संघटनेच्या वतीने अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. त्या अनुषंगाने एकनाथ डवले, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांचेकडे वारंवार बैठका देखील संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने दि. १३ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णया द्वारे शासनाने महाराष्ट्र विकास सेवा गट–अ संवर्गातील उप आयुक्त (आस्थापना) व उप आयुक्त (विकास) यांच्या पदनामामध्ये अपर आयुक्त (आस्थापना) व अपर आयुक्त (विकास) असा बदल केलेला आहे. पदनामतील बदलामुळे महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रीत अधिकारी संघटनेतील अधिकारी यांचेकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. राज्याच्या ग्रामविकास कार्यात अधिक गतिमानता आणण्याचा, तसेच शासनाच्या योजनांचा लाभतळागाळातील नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रीत अधिकारी अधिक सक्षमपणे काम करतील.

यासाठी देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री – महाराष्ट्र राज्य, एकनाथ शिंदे, उपमुख्य मंत्री, अजित पवार, उपमुख्यमंत्री, जयकुमार गोरे, मंत्री ग्राम विकास व पंचायत राज, योगेश कदम, राज्य मंत्री ग्राम विकास व पंचायत राज तसेच एकनाथ डवले, प्रधान सचिव, ग्राम विकास यांनी संघटनेच्या मागणीस सकारात्मक प्रतिसाद देऊन अनेक वर्षांपासून प्रलंबीत असलेली मागणी पूर्ण झालेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रीत अधिकारी संघटनेच्या वतीने या सर्वांचे यांचे मनःपूर्वक आभार.





धर्मवीर,स्वराज्य रक्षक,छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त खा.बजरंग सोनवणे,आ.संदीप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी अभिवादन केले, यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शंभूप्रमे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजस्थानी माध्यमिक विद्यालय चे घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१४ मे**

शहरातील माहेश्वरी शिक्षणाप्रसारक संस्था संचलित राजस्थानी माध्यमिक विद्यालय ने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२५ मध्ये घवघवीत यश मिळवत शाळेचा निकाल ९७.३९% लावला.

राजस्थानी चे एकूण विद्यार्थी –१९२ विध्यार्थी बसले होते तयापैकी *९०% पेक्षा अधिक गुण प्राप्त –३० विध्यार्थी आहेत. ९० % पेक्षा ज्यास्त गुण मिळवणारे गुणवंत विद्यार्थ्यांची नावे– १) शिवानी हनुमानदास गिल्डा:–९७.४०% २) सेजल गजानन पवार:–९७.००% ३) दिशा बाळासाहेब डाके:–९५.४०% ४) अनुष्का अंकुशराव जाधव–९५.२०% ५) वेदांत विठ्ठल बोबडे:–९४.००% ६) प्रतीक्षा गंगाधर मिठे:–९३.६०% ७) स्वरूपा केशव बादाडे:–९३.४० % ८) श्रावणी श्यामसुंदर शर्मा:–९३.४०% ९) शर्वरी सुरेश वाघमारे:–९३.४०% १०) रणवीर सुनील घोळवे:–९३.२०% ११) प्रतिभा गजेंद्र



उबाळे:–९३.२०% १२) गौरी किरण धारकर:– ९३.०० १३) मोहित विनोद कुमार लड्डा ९२.६० १४) श्रीनिवास चंद्रशेखर देशमुख ९२.०० १५. प्रिया बाळासाहेब राठोड ९२.०० १६. अक्षदा राधाकिसन आळसे ९१.८० १७. ओंकार तुकाराम कोरडे ९१.८० १८. आशुतोष उमेश मालपाणी ९१.८० १९. ऋतुजा दशरथ सरवदे ९१.८० २०. सार्थक पांडुरंग उगले ९१.८० २१. कृष्ण दत्तात्रय गरड ९१.६० २२. गौरवी राजेश मुठाळ ९१.२० २३. गायत्री गणेश नायकल ९१.२० २४. अनन्या रतनेश्वर स्वामी ९१.२० २५. कृष्ण अशोकराव शेजुल ९०.४० २६. ऋतुजा विलास धनवडे ९०.२० २७. विद्या अशोक शेवाळे ९०.२० २८. प्रीतम मोहन ढिसले ९०.०० २९. तुषार दिलीप पावले ९०.०० ३०. दिव्या उलसराव थावरे ९०.०० शाळेचे*८०% च्या पुढे:–७२ विद्यार्थी उत्तीर्ण आहेत तर विशेष प्राविण्य विद्यार्थी– ३०,प्रथम श्रेणी –१२५ द्वितीय श्रेणी – २९ तृतीय श्रेणी –०३ एकूण उत्तीर्ण – १८७ अनुत्तीर्ण:–०४ अशी संख्या आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व पालकांचे मा.संस्था अध्यक्ष आर.जी.बजाज साहेब ,सचिव रामानंदजी लड्डा साहेब व सर्व संचालक मंडळ व मुख्याध्यापक चंद्रशेखर तौर सर व सर्व कर्मचारी यांच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन केले.

# वाढदिवसाच्या निमित्ताने ५ लाख ३७ रूपये जमा झाले, पंतप्रधान सहाय्यता निधीला अक्षय मुंदडा रक्कम जमा करणार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१४ मे**

राजकीय क्षेत्रात काम करणारा तरूण संवेदनशील भुमिकेत वागत असेल तर खर्या अर्थाने समाज आदर्शाचे अनुकरण निश्चित करतात. भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडांनी स्वत:चा वाढदिवस साधेपणाने साजरा करताना विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले. शिवाय शुभेच्छा देणार्या हितचिंतकांनी पंतप्रधान सहाय्यता निधीला योगदान देण्याचे आवाहन केल्यानंतर दिवसभरात सुमारे ५ लाख ३७ हजार रूपयाचा निधी जमा झाला तर ७५ तरूणांनी रक्तदान केले.


भारत–पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर मुंदडांनी वाढदिवस रद्द करून सामाजिक उपक्रम हाती घेण्याचे आवाहन केले होते. शुभेच्छा देण्यासाठी येणार्या



कार्यकर्ते, मित्र परिवारांनी हार–तुरे न आणता पंतप्रधान सहाय्यता निधीला अर्थसहाय्य योगदान देण्याची विनंती केली होती. त्यानुसार अक्षय बंगल्यावर दिवसभर शुभेच्छा देणार्याची गर्दी होती. मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित केले. त्यात ७५ तरूणांनी रक्तदान केले. पंतप्रधान सहाय्यता निधीमध्ये शुभेच्छा देण्यासाठी येणार्या सर्वांनीच योगदानाच्या माध्यमातुन सहभाग घेतला. दिवसभरानंतर सायंकाळच्या सुमारास एकुण रक्कम जमा सुमारे ५ लाख ३७ हजार झाल्याची माहिती भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी दिली. तसं पहाता राजकारणात वाढदिवस थाटामाटाने साजरा करण्याची फॅशन आली असताना असा एखादा तरूण नेता सामाजिक संवेदना ज्यातुन राष्ट्रभक्तीचे आदर्श निर्माण करतो, खर्या अर्थाने कौतुकास्पद म्हणावे लागेल. वाढदिवसाच्या निमित्ताने दिवसभर बंगल्यावर अक्षय मुंदडा बसुन होते. मात्र साध्या पुष्पगुच्छाचा देखील स्विकार केला नाही. वास्तविक पहाता भारताने पहेलगाममध्ये झालेल्या हल्ल्याचा ऑपरेशन सिंदुर द्वारे जबरदस्त बदला घेतला. पण युद्धजन्य परिस्थितीमुळे वाढदिवस त्यांनी साजरा केला नाही. विविध सामाजिक उपक्रम कार्यकर्त्यांनी घेतले ज्यामध्ये वृक्षारोपण, आत्महत्याग्रस्त शेतकर्यांना बियाणाचे वाटप, मधुमेह तपासणी तथा इतर कार्यक्रम. सामाजिक कार्याचे आदर्श नेतृत्वाकडून जेव्हा प्रस्थापित होतात त्यावेळी संवेदनशीलता वाढते. याच आदर्शाची पेरणी केज मतदारसंघात मुंदडा कुटुंबियांनी १९८० ते ९०च्या दशकापासून केली तोच वारसा सुपुत्राच्या माध्यमातुन पुढे सुरू झालेला दिसतो. सामान्य जनतेच्या सुखदु:खात सहभागी व्हायचं आणि गोरगरिबांची सेवा करायची हा मुळ पिंड कुटुंबियांचा आहे. वर्तमानकाळात लग्नसराईचे दिवस असल्याने आ.सौ.नमिताताई मुंदडा, जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा आणि अक्षय संपुर्ण मतदारसंघात लग्नाचे निमंत्रण तिथे यांचे पाऊल मोसमात नाही म्हटले तरी १५१ पेक्षा अधिक लग्न कुटुंबियांनी लावल्याचे कळते.

# जवाहर विद्यालयाची यशस्वी परंपरा कायम







**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१४ मे**

माजलगाव :महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत केसापुरी वसाहत येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९५.६५ टक्के लागला असून रोहिणी पवार ९८.२०,शाहरूख तांबोळी ९६,समृद्धी जाधव ९५.४०,श्रावणी हालबुर्गे ९३,ऋतुजा ठेंगल ९२,नंदिनी खिरे ९१.२०पुर्वा सिरसट ९०.२०,सोफियान शेख ९०.२० असे गुण घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपली यशस्वी परंपरा कायम राखली आहे.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल नवविकास मंडळाचे अध्यक्ष ड.एस.आर.शर्मा, कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख, उपाध्यक्ष ड.आर.डी.भिलेगावकर, सहकार्यवाह आर.बी.देशमुख,संचालक शिरीष देशमुख,डॉ.सचिन देशमुख, राहुल मुळी, मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते, पर्यवेक्षक संतोष जोशी यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## अभिषेक दुधाळचे दहावीच्या परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१४ मे**

येथील वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय दुधाळ यांचा मुलगा चि.अभिषेक दुधाळ या विद्यार्थ्याने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९५.६०% गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्चमध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी चि.दुधाळ अभिषेक दत्तात्रय या विद्यार्थ्याला मराठी विषयात ८९, हिंदी ९३ इंग्रजी ९१, गणित ९६, विज्ञान ९८ तर सामाजिक शास्त्रात १०० पैकी १०० गुण मिळवून एकूण ५०० पैकी ४७८ गुण मिळवून घवघवीत यश मिळविले आहे. त्याने मिळविलेल्या यशाबद्दल सर्वत्र कौतूक होत आहे.

# जबरी चोरीचे गुन्हयातील आरोपीस अटक, गुन्हयात वापरलेली मोटारसायकल आणि चोरलेला मोबाईल चोरटयाकडुन केला जप्त

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

एक इसम दिनांक १०.०५.२०२५ रोजी रात्री महिंद्रा शो रुमचे पाठीमागील पुलाजवळुन रस्त्याने मोबाईल वर बोलत जात असतांना चोरट्यांनी त्यास पकडुन त्याचेजवळचा मोबाईल बळजबरीने हिसकावुन घेतला व पळुन जात असतांना त्या इसमाने एका चोरट्यास स्थानिक नागरीकांचे मदतीने पकडुन पोलीस ठाणे चंदनझिरा यांचे स्वाधीन केले होते, त्यासंदर्भात पोलीस चंदनझिरा जि जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन नागरीकांनी पकडलेला आरोपी नामे विशाल संतोष टाकळकर रा नुतन वसाहत जालना यास गुन्हयात अटक करुन त्याचा पीसीआर घेवुन गुन्हयाचा सखोल तपास करुन त्याचेकडुन इतर दोन आरोपीतांचे नावे निष्पण्ण करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोउपनि / सैय्यद अफसर हे करीत आहेत. सदर गुन्हयाचे तपासात पळुन गेलेले दोन्ही आरोपीतांची नावे निष्पण्ण करुन त्या दोन आरोपीतांपैकी एक आरोपी हा नुतन वसाहत येथे असल्याचे खात्रीलायक गुप्त बातमी पोलीस निरीक्षक श्री सम्राटसिंग राजपुत यांना मिळालेवरुन त्यांनी पथकामार्फतीने तात्काळ आरोपी नामे यश ऊर्फ अजय विनोद भालेराव रा नुतन वसाहत जालना यास ताब्यात घेवुन त्यास नमुद गुन्हयाचे तपासकामी अटक करुन त्याचा पीसीआर घेवुन पीसीआर दरम्यान त्यास विचारपुस करुन त्याचेकडुन तीनही आरोपीतांनी गुन्हयात वापरलेली हिरो होन्डा एच एफ डिलक्स मोटार सायकल आणि फिर्यादीचा बळजबरीने हिसकावुन चोरुन नेलेला रेड मी कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयातील




एक आरोपी फरार असुन त्याचा शोध घेणेकामी पथकाची नेमणुक करण्यात आलेली आहे. सदरची कामगीरी मा. श्री. आयुष नोपाणी, प्रभारी पोलीस अधीक्षक, जालना, मा. श्री. अनंत कुलकणी, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग जालना यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे चंदनझिरा पोलीस निरीक्षक/ सम्राटसिंग राजपुत, पोउपनि / सचीन सानप, पोउपनि / एम बी स्कॉट, पोउपनि / सैय्यद अफसर यांचेसह पथकातील अंमलदार विशाल लोखंडे, गजानन जारवाल, संतोष वनवे, शिवाजी जमधडे यांनी केली आहे.

## संक्षिप्त

### शिवसेना शहर शाखेच्या वतीने छ . संभाजी महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना शहर शाखेच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी युवा सेनेचे राज्य सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना शहरप्रमुख तथा गटनेते नगरसेवक विष्णूभाऊ पाचफुले, जयंतीचे अध्यक्ष सचिन कांबळे, करणराजे जाधव, अर्जुन राऊत, नगरसेवक वाजिदभाई, किरण शिरसाट, सागर पाटील, कपिल खरात, दीपक वैद्य, किशोर शिंदे, युवा सेना जिल्हा समन्वयक शुभम टेकाळे, मनोज देवरे, पांडुरंग खैरे, राम भुतेकर, राम खांडेभराड, योगेश रत्नपारखे, किरण शिरसाट, पांडुरंग शिंदे आणि राजू रत्नपारखे आदी मान्यवर उपस्थित होते .



### दहावी परिक्षेत यश देशमुखचे याचे दैदिप्यमान यश

**तभा वृत्तसेवा**
**परतूर / प्रतिनिधी**



परतुर येथील आनंद माध्यामिक विद्यालयात शिक्षण घेत असलेला यश श्याम देशमुख यांनी इयत्ता दहावीच्या परिक्षेत ९५. २० टक्के गुण प्राप्त करून दैदिप्यमान यश संपादन केले आहे. यश यास गणितात ९९, इंग्रजीत ८८, विज्ञान ९४ , हिंदी ९१, मराठी ८२ सोशल सायन्स या विषयात ९४ गुण मिळाले असून एकूण पैकी ५०० पैकी ४६६ + १० गुण मिळवून त्याने ९५ . २० टक्केवारी मिळविली आहे. आनंद माध्यामिक विद्यालयात म्हणजेच शाळेतून तो पहिला आला आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे संस्थाचालक एकनाथ कदम यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते महेश नळगे तसेच मित्र परिवारातून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### दहावी परिक्षेत आदीराज शेळके याचे दैदिप्यमान यश

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**



येथील आदीराज दीपक शेळके यांनी इयत्ता दहावीच्या परिक्षेत ९४.४० टक्के गुण प्राप्त करून दैदिप्यमान यश संपादन केले आहे. आदीराज शेळके हा बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील चैतन्य गुरुकुल व ज्युनियर कॉलेजचा विद्यार्थी आहे. इयत्ता सातवी पर्यंतचे त्याचे शिक्षण हे जालना येथील श्री.म. स्था. जैन विद्यालयात झाले आहे. आदीराज त्याच्या यशाचे श्रेय हे त्याचे आत्येमामा रविंद्र वायाळ, आत्या रेणुका वायाळ (शेळके) व त्याच्या चैतन्य गुरुकुल येथील शिक्षकांना देतो. आदीराज यास गणितात ९८, इंग्रजीत ९६, विज्ञान ९४, हिंदी ८८, मराठी ९४ सोशल सायन्स या विषयात ९० गुण मिळाले असून एकूण ५०० पैकी ४७२ गुण मिळवून त्याने ९४.४० टक्केवारी मिळविली आहे. चैतन्य गुरुकुल व ज्युनियर कॉलेजमध्ये म्हणजेच शाळेतून तो पाचवा आला आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे चैतन्य गुरुकुलचे शिवकुमार नागपुरे, हर्षवर्धन सावळे, परिहारसर, शारदा जोशी, जयसर आदी शिक्षकगण तसेच दीपक शेळके, रविंद्र वायाळ, रेणुका वायाळ, वर्षा शेळके, भारत बोराडे, उदयराज शेळके, रेखा जाधव, दिलीप कळणे, चंदा केंधळे, साक्षी भुतेकर, भगवान जाधव, उद्धव केंधळे, सुधाकर खरात, केदार गोरे, आनंद जाधव, शितल केंधळे, दिंगबर मानवतकर, प्रविण गोरे, शितल मानवतकर, सोनाली गोरे, मीना काळे-आगळे, कमलताई तुळ्ळे, माऊली कळणे, अंकीता बोराडे, यांच्यासह मित्र परिवारातून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# भाजपाच्या जालना महानगर जिल्ह्याच्या जिल्हाध्यक्षपदी भास्कर दानवे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशातील संघटनात्मक जिल्ह्यांकरिता जिल्हाध्यक्षपदांची घोषणा पक्षाचे निवडणूक अधिकारी आमदार चैनसुख संचेती यांनी नुकतीच केली आहे. भाजपाचे जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांच्या खांद्यावर जालना महानगर जिल्ह्याची धुरा सोपवण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांनी आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे, भाजपा कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आभार मानले व माजी खा .रावसाहेब दानवे, आ.नारायण कुचे, आ.संतोष दानवे यांनी अभिनंदन केले आहे.पक्षाच्या निरीक्षकांनी नुकतीच जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेतली आणि त्यामध्ये जिल्हाध्यक्ष पदासाठी इच्छुक असणाऱ्यापैकी प्रत्येक उमेदवाराला पसंती क्रमानुसार मते देण्याची प्रक्रिया राबविण्यात आली होती. भास्कर दानवे यांचा प्रदीर्घ संघर्ष लक्षात घेता हे महत्त्वाचे पद ठरणार आहे. हि निवड पक्षामार्फत जाहीर होताच भाजपा जालना महानगराच्या वतीने फटाके फोडून व पेढे वाटून जल्लोष साजरा करण्यात आला. भास्कर दानवे यांनी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या नेतृत्वाखाली यापूर्वी भाजप जिल्हा उपाध्यक्ष तसेच जालना विधानसभा प्रमुख म्हणून काम पाहिले आहे व चांगले काम करून दाखवले. या सर्व बाबींचा सकारात्मक विचार करूनच त्यांची जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याचे मानले जात आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही निवड महत्त्वाची मानली जाते.पक्षाने माझ्यावर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी दिली आहे. पक्षाने दिलेली कोणतीही जबाबदारी पार पाडणे माझे कर्तव्य आहे. त्यामुळे जिल्हाध्यक्ष म्हणून चांगले काम करण्याचा व सर्वांना सोबत घेऊन जिल्ह्यात भाजपचे संघटन अधिक मजबूत करण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे, असे त्यांनी सांगितले आहे.यावेळी मा.जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, मा.जिल्हाध्यक्ष सतीश जाधव, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, उद्योजक अर्जुन गेही, सिद्धिविनायक मुळे, राजेंद्र भोसले, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलीये, मंडळ अध्यक्ष अमोल धानुरे, विष्णू डोंगरे, शशिकांत घुगे, अमोल करंजेकर, वसंत शिंदे, राजेश जोशी, सुभाष सले, सुमित सुरडकर, नागेश अंभोरे, प्रतीक पोहेकर, गोविंद ढेम्बरे, संतोष खंडेलवाल, कृष्णा गायके, निळकंठ कुलकर्णी, दत्ता जाधव, गणेश वाघमारे, विकास कदम, निलेश गवळी, कृष्णा शिंदे, राजेंद्र जगताप, शिवाजी शिंदे, शाम उगले, सतीश जारे, सुनील अंभोरे, तुळशीदास अंभोरे, आयुष अंभोरे, गोरक्षनाथ गायकवाड, अनिल वरगणे, विशाल वरगणे, भगवान वरगणे, राजू वरगणे, विराट नामदे, योगेश विधाते, गौरव गोधेकर आदींची उपस्थिती होती .

## शालांत परीक्षेत सुधीर आगळेचे यश

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**



येथील सरस्वती भुवन हायस्कूलचा विद्यार्थी सुधीर संजय आगळे याने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९१. ८२ टक्के गुण प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले आहे.सुधीरने संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले असून मराठी विषयात ९१, इंग्रजी विषयात ९२ तर गणित विषयात ८१ गुण प्राप्त केले आहेत.या यशाचे श्रेय त्याने शिक्षक वृंद आणि आई वडिलांना दिले आहे.या यशाबद्दल सुधीर आगळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## जनविकास शिक्षण संस्था भोकरदनचा निकाल दरवर्षीप्रमाणेच यंदाही १००%

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ व महाराष्ट्रराज्य माधमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा दहावीचा निकाल नुकताच झाला असून यामध्ये भोकरदन शहरातील जनविकास शिक्षण संस्था संचलित, पायोनीयर इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल, श्री गणपती इंग्लिश हायस्कूल व श्री गणपती मराठी विद्यालयाचा निकाल दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी शंभर टक्के लागला असून पायोनीयर सीबीएसई स्कूल चे एकुण ४७ विद्यार्थी परिक्षेत होते सर्व विद्यार्थी विषेश प्राविण्य घेऊन पास झाले. यामध्ये टॉप ५ व्होहरऑल टॉपर्स मध्ये शाळेची विद्यार्थीनी कु शेरे शिवाणी ९३.२०% मार्क घेऊन शाळेत प्रथम व समिंद्रे प्रथमेश ९२.४०% घेऊन द्वितीय, मगर शुभम ९१.२०% व ठोंबरे अनुष्का ९१.२०% घेऊन तृतीय आले. तर वनार्से वैष्णवी ९१.००% घेऊन पाचवा आला.

श्री गणपती इंग्लिश सर्व हायस्कूलचे एकुण ८२ विद्यार्थी परिक्षेत बसले होते शाळेची विद्यार्थीनी कु वैष्णवी जाधव ९३.८०% मार्क घेऊन शाळेत प्रथम व कु शहा नसरीन ९३.६०% घेऊन व्दितीय, काळे शिवाजी ९३.४०% मार्क घेऊन तिसरा आला.

## बेघर निवारा केंद्रातील '' त्या '' विद्यार्थिनींनी मिळवलेले यश प्रेरणादायी - कैलास गोरंट्याल

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनीधी**

बेघर निवारा केंद्रांत राहून कोणतेही शिकवणी वर्ग न लावता केवळ सेल्फ स्टडी करत विद्यार्थिनींनी परीक्षेत मिळवलेले यश निश्चितच प्रेरणादायी असून त्यांच्या या यशाचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी केले आहे.



जालना शहर महानगरपालिका संचलित आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्रात वास्तव्यास असलेल्या शालिनी चौधरी या विद्यार्थिनीने इयत्ता बारावी परीक्षेत ७० टक्के व पूजा लक्ष्मी नंदकिशोर ठेंग या विद्यार्थिनीने इयत्ता दहावी परीक्षेत ८० टक्के गुण मिळवून घवघवीत यश मिळवले आहे. या यशाबद्दल प्रितीसुधा नगर येथील निवासस्थानी या दोन्हीही यशस्वी विद्यार्थिनींचा माजी आमदार कैलास गोरंटयाल व माजी नगराध्यक्षा सौ.संगीताताई गोरंटयाल यांच्या हस्ते छोटेखानी सत्कार करण्यात आला.यावेळी युवा नेते अक्षय गोरंटयाल, कैलास ब्रिगेड सेवाभावी संस्थेचे संचालक अरुण सरदार, सचिव वैशाली सरदार, स्वयंसेविका अलका झालटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. डोक्यावर छत नाही, वडिलांची साथ नाही,आईला काही कळत नाही अशी हालाखीची परिस्थिती असतांना तसेच कोणतेही क्लास न लावता सेल्फ स्टडी करत बेघर निवारा केंद्रांत वास्तव्यास असणाऱ्या शालिनी चौधरी आणि पूजा ठेंग या दोन्हीही विद्यार्थिनींनी मिळवलेले यश निश्चितच कौतुकास्पद असल्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी सांगितले. या विद्यार्थिनींनी मिळवलेले यश इतर विद्यार्थ्यांसाठी आदर्श निर्माण करेल असा विश्वास देखील गोरंटयाल यांनी यावेळी व्यक्त केला.

## विवेकानंद इंग्लिश स्कुल चे CBSE १० वी बोर्ड परीक्षेत अभूतपूर्व यश

**तभा वृत्तसेवा**
**परतूर / प्रतिनिधी**



शैक्षणिक वर्ष २०२४-२५ यावर्षी घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेत परतुरच्या विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर च्या विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व यश संपादन केले आहे . यात ऋतुराज कदम याने ९९.२०%,आदित्य सोनखेडकर ९८.८०%, शिवेश गवंडरे ९८.२०%, अथर्व मुंदडा ९७.४०%, विश्वजीत गुंजकर ९७%, प्रद्युम्न जोगदंड ९६.२०%, अनुराधा काळे ९५.८०%, धनश्री गिरी ९५.८०%, पृथ्वीराज सोळंके ९५.६०%, आदिती अंभोरे ९५.४०%, प्रतीक गायकवाड ९४.८०%, कौस्तुभ काकडे ९४.४०%, रिया चव्हाण ९४%, आदित्य राठोड ९३.८०%, सोनल अंभुरे ९३.६०%, स्वराज राजमाने ९३.६०%, लक्ष्मीकांत मुळे ९३.४०%, प्रद्युम्न झाडे ९३.४०%, केदार अंभुरे ९३%, तनुष्का सोळंके ९२.८०%, वैभव भोसले ९२.४०%, वेदिका निर्वाळ ९१.६०%, गौरी अग्रवाल ९०.८०%, ईश्वरी टेकाळे ९०.४० मिलवुन यश मिळवले. ऋतुराज कदम याने खढ आणि गणित विषयात १०० पैकी १०० गुण, आदित्य सोनखेडकर याने इंग्रजी आणि खढ विषयात १०० पैकी १०० गुण, अथर्व मुंदडा खढ विषयात १०० पैकी १०० गुण, पृथ्वीराज सोळंके याने मराठी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले.१० विद्यार्थी ९५% पेक्षा जास्त गुण मिळवले तर २४ विद्यार्थी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवुन उत्तीर्ण झाले आहेत.या अभूतपूर्व यशाबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचे विवेकानंद सेवा केंद्राचे अध्यक्ष डॉ शेषरावजी बाहेकर, संचालक संदीप बाहेकर, विवेकानंद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता शिंदे, प्राचार्य भालचंद्र महाजन, विजयकुमार दंदाले, रश्मी यादव व सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

# एजन्सीवर लाखोंचा खर्च, खांब वाकलेलेच, ताराही लोंबकळलेल्याच ! महावितरणच्या अभियंत्याचे एजन्सी धारकांना पोषणाचे अर्थपूर्ण धोरण ?

## महावितरच्या उदासिन अभियंत्यामुळे मान्सूनपूर्वच्या कामांचे तिन तेरा ..!

**तभा वृत्तसेवा**
**मंठा / नागेश कुलकर्णी**

मेठा शहरासह अनेक खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीत वाकलेले विद्युत पोल त्यावरून न ओढलेल्या लोंबकळलेल्या तारा जमिनीपासून खूप कमी उंचीच्या अंतरावर लोंबकळत आहेत. यामुळे वीजपुरवठा सुरळीत होत नाही तसेच शेतकरी रात्री-अपरात्री ऐन उन्हाळ्यात शेतीचे कामे ट्रॅक्टरच्या सहाय्याने करित आजतात त्यावेळी ट्रॅक्टर चालकांना शेतातील माहिती नसल्याने अचानक ट्रॅक्टरला शेतातील खांबावर लोंबकळत आसलेल्या तारांमुळे जिवितहाणी सारख्या होणाऱ्या घटणा होऊ शकतात यात दुमत नाही . अशा घटना घडू नयेत म्हणून त्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी महावितरणकडून मान्सूनपूर्वच्या कामांवर लाखो रुपये खर्च केला जातो . याचे टेंडर प्रक्रिया प्रक्रिया करून एखाद्या एजन्सीकडे टेंडर सोडुन त्या मार्फत कामे केली जातात. एजन्सीकडे शहरातील कामा सोबत ग्रामीण भागातील विजेच्या कामांचे प्रश्न सोडवण्यासाठी दिलेले असतात मात्र एजन्सी काम न करताच बिल उचलून घेत असल्याने वारंवार विजेच्या दुर्घटना घडत आहेत. रात्रभर वीजपुरवठा बंद होत आहे. अनेक ठिकाणच्या तारा लोंबकल्या आहेत, तर पोल पूर्णपणे वाकलेले आहेत. त्यामुळे वीजपुरवठा वारंवार खंडित होत आसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत . यांच्या देखभाल दुरुस्त्यांच्या कामासाठी एजन्सींना महावितरणने लाखो रुपयाचे बिले दिले आहेत. मात्र, त्या पैशाने दुरुस्ती का केली जात नाही ? असा प्रश्न शहरातील ग्राहकांकडून उपस्थित केला जात आहे. महावितरणच्या अभियंत्यांकडुण याकडे 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष केले जात आहे. महावितरण विभागाचा गलथान कारभार वारंवार चव्हाट्यावर येत आहे. सध्या उन्हाळा असून, अवकाळी पाच मिनिटांचा जरी पाऊस जरी आला तर वीजपुरवठा खंडित होतो. एखांद्या महावितरणच्या हेल्पलाईनवर फोन करुण तक्रार केल्यास अधिकाऱ्यांनी दखल घेण्या ऐवजी उलट सुलट चर्चा करूण फोन बंद करण्याचे काम करित आसल्याचे मंठा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या परिभाषेतून ऐकायला मिळत आहे . काय असतात एजन्सीकडे कामे ? संपूर्ण भागात विद्युतपुरवठा करणाऱ्या विद्युतवाहिन्यांची देखभाल दुरुस्तीची कामे करणे तसेच त्यामध्ये गंजलेले, वाकलेले विद्युत पोल, लोंबणाऱ्या विद्युत तारा ते ३३ केव्ही, ११ केव्ही, एचटी लाइन, उघडे रोहित्र दुरुस्ती दुरुस्ती, अशी विविध देखभाल दुरुस्तीची कामे यांना दिलेलि असतात. एखाद्या भागात एखाद्या पोलची, तारांची दुरुस्ती केल्यानंतर त्याचे फोटो बिलाला लावणे असा नियम आहे. मात्र, एजन्सींकडून हा नियम पायदळी तुडवला जात आहे. तक्रार करूनही कामे तसेच आहेत. मात्र, काम कागदोपत्री सुरू आहे का, असा देखील प्रश्न आहे. २०२४-२५ मध्ये या एजन्सींकडून अनेक निर्माण



होणाऱ्या विद्युत समस्यांचे निराकरण करणे अपेक्षित होते. मात्र, तसे होताना दिसत नाही. देण्यात आलेली कामे एजन्सी करतात की नाहीत, या एजन्सीवर वचक कोणाचा आहे, याबाबत विचारणा करण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला, शहर अभियंत्याने, अतिरिक्त अभियंत्याकडे आणि अतिरिक्त अभियंत्याने मुख्य अभियंत्याकडे बोट दाखवीत टोलवाटोलवी केली जाते. तरी मंठा तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी या रझाकारी अधिकाऱ्यांना धारेवर धरत त्यांच्याकरुण शेतकऱ्यांचे कामे करूण घ्यावीत तसेच कामात हायगय करणाऱ्या महावितरणच्या कर्मचारी , अभियंता यांच्यावर योग्य ति करवाई करावी अशी मागणी मंठा तालुक्यातील शेतकरी बांधवांतून होत आहे . तीन महिन्यात पासून महावितरण कंपनीच्या कार्यालयात जाऊन विजेच्या तारा लोबकळत असल्याचे सांगून व त्या बाबतचे फोटो दाखवून देखील यावर कोणत्याच प्रकारची कारवाई होत नाही याचे जास्त नवल वाटते - रामराव डोंबे शेतकरी. जिवित्वास थोका निर्माण झाला असून देखील एजन्सी व महावितरण कंपनी कोणत्याही प्रकारचे सोयर सुतक राहिलेले नाही..... रंगनाथ कुलकर्णी शेतकरी शहरासह ग्रामीण भागातील विविध वाकलेले विद्युत पोल त्यावरून ओढलेल्या तारा जमिनीपासून खूप कमी उंचीवर लोंबकळत आहेत. यामुळे वीजपुरवठा रात्री-अपरात्री ऐन उन्हाळ्यात बंद होत आहे.अशा घटना घडू नयेत म्हणून त्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी महावितरणकडून लाखो रुपये खर्च एजन्सीकडे मार्फत कामावर केला जातो. एजन्सीकडे शहरातील कामा सोबत ग्रामीण भागातील विजेच्या कामाचे प्रश्न सोडवण्यासाठी दिलेले असतात मात्र एजन्सी काम न करताच बिल उचलून घेत असल्याने वारंवार विजेच्या दुर्घटना घडत आहेत. रात्रभर वीजपुरवठा बंद होत आहे. अनेक ठिकाणच्या तारा लोंबकल्या आहेत, तर पोल पूर्णपणे वाकलेले आहेत. त्यामुळे वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. यांच्या देखभाल दुरुस्त्यांच्या कामासाठी एजन्सींना महावितरणने लाखो रुपयाचे दिले आहेत. मात्र, त्या पैशाने दुरुस्ती केली जाते का,केली गेली ? असा प्रश्न ग्रहकांमघुन उपस्थित जात आहे. महावितरणकडून याकडे 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष केले जात आहे. महावितरण विभागाचा गलथान कारभार वारंवार चव्हाट्यावर येत आहे. सध्या उन्हाळा असून, अवकाळी पाच मिनिटांचा जरी पाऊस जरी आला तर वीजपुरवठा खंडित होतो. काय असतात एजन्सीकडे कामे ? संपूर्ण भागात विद्युतपुरवठा रणाऱ्या विद्युतवाहिन्यांची देखभाल दुरुस्तीची कामे यात आहेत. त्यामध्ये गंजलेले, वाकलेले विद्युत पोल, लोंबणाऱ्या विद्युत तारा ते ३३ केव्ही, ११ केव्ही, एचटी लाइन, उघडे रोहित्र दुरुस्ती दुरुस्ती, अशी विविध देखभाल दुरुस्तीची कामे यांना दिलेलि असतात. एखाद्या भागात एखाद्या पोलची, तारांची दुरुस्ती केल्यानंतर त्याचे फोटो बिलाला लावणे असा नियम आहे. मात्र, एजन्सींकडून हा नियम पायदळी तुडवला जात आहे. तक्रार करूनही कामे तसेच आहेत. मात्र, काम कागदोपत्री सुरू आहे का, असा देखील प्रश्न आहे. २०२४-२५ मध्ये या एजन्सींकडून अनेक निर्माण होणाऱ्या विद्युत समस्यांचे निराकरण करणे अपेक्षित होते. मात्र, तसे होताना दिसत नाही. देण्यात आलेली कामे एजन्सी करतात की नाहीत, या एजन्सीवर वचक कोणाचा आहे, याबाबत विचारणा करण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला, शहर अभियंत्याने, अतिरिक्त अभियंत्याकडे आणि अतिरिक्त अभियंत्याने मुख्य अभियंत्याकडे बोट दाखवीत टोलवाटोलवी केली जाते.

**तीन महिन्यात पासून महावितरण कंपनीच्या कार्यालयात जाऊन विजेच्या तारा लोबकळत असल्याचे सांगून व त्या बाबतचे फोटो दाखवून देखील यावर अभियंता , संबंधीत लाईनमन कोणत्याही प्रकारची दखल घेत नाहीत . या महावितरच्या अधिकाऱ्यांवर कोणाचीही वचक राहीली नसल्याने अधिकारी मनमानी कारभार करत आसल्याचे वाटत आहे याचे नवल रोतकऱ्यांना वाटायला लागले**

**– रामराव डोंबे शेतकरी**

**आमच्या जिवित्वास थोका निर्माण झाला असून देखील एजन्सी व महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे सोयर सुतक राहिलेले नाही.**

**– रंगनाथ कुलकर्णी शेतकरी**